PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
B'Live® Delightful delicacies!
SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२० ■ रविवार २३ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.No./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

### छात्रों की गुंज कार्यक्रमात विद्यार्थिनींशी संवाद

## महिला स्वतंत्र राहू नये, हा मनुस्मृतीचा डाव महिलाच देशाची मोठी ताकद : राहुल गांधी

**पुणे, दि. २२ : महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. महिला कधीच स्वतंत्र**




**राहू नये, हा मनुस्मृतीचा डाव असल्याचे राहुल गांधी म्हणाले. तुम्ही स्वत:शिवाय कोणालाच बांधिल नाही आहात. महिलांवर पोरुषाचा अधिकार नाही. महिलांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले आहे. तरी देखील त्यांना विशिष्ट चौकटीत बसवले जाते, अशी खंत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी व्यक्त केली. राहुल गांधी पुण्यात आयोजीत करण्यात आलेल्या छात्रो की गुंज या कार्यक्रमात बोलत होते. पुणे म्हणजे प्रेम असेही राहुल गांधी यावेळी म्हणाले. पिंजरा तोडा हीच या कार्यक्रमाची संकल्पना आहे. मी इथे राजकारणावर बोलायला आलो नाही असेही राहुल गांधी म्हणाले.**

पुणे येथे आज झालेल्या कार्यक्रमात काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले, शिक्षणातही मुलींसोबत भेदभाव केला जातो. तरुणांची लोकसंख्या ही भारताची सर्वात मोठी ताकद आहे. यावेळी काही विद्यार्थीनींनी आपले अनुभव देखील राहुल गांधी यांच्यासोबत सांगितले. शिक्षण घेत असताना किंवा नोकरी करत असताना कोण- कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याबाबतची माहिती विद्यार्थीनींनी दिली. मुलींवर मोठ्या प्रमाणात बंधने आणली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. सार्वजनिक ठिकाणी प्रवास करताना देखील महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो असेही विद्यार्थीनींनी सांगितले. आज भारताची ताकद काय आहे? प्रत्येकजण ते आपापल्या परीने स्पष्ट करतो. पण, सत्तर कोटी लोकांची स्वप्ने आणि विचार हीच भारताची ताकद असल्याचे राहुल गांधी यावेळी म्हणाले. या देशातील मुली स्वतंत्र असणे महत्त्वाचे आहे, असेही राहुल गांधी यावेळी म्हणाले.

**देशात सहा टक्के महिलांवर अत्याचार**

देशात शंभर पैकी सहा महिलांवर अत्याचार होत आहेत. दरवर्षी साडेचार लाख स्त्रीभूण हत्या होत असल्याचे राहुल गांधी यावेळी म्हणाले. आर्थिक हिंसाचारालाही अनेक महिलांना तोंड द्यावे लागते, (पान २ वर)



### आयफोन हे कारण नाही फक्त प्रश्न जिवंत आहेत

संभाजीनगर, दि.२२: जिल्ह्यातील तरुणाच्या आत्महत्येनंतर सोशल मीडियावर एकच चर्चा सुरू झाली, आयफोन हवा होता म्हणून त्याने आयुष्य संपवले. पण, तपास पुढे सरकला आणि या चर्चेलाच आता पोलिसांनी ब्रेक लावला. आयफोन, हे आत्महत्येचे कारण असल्याचे प्राथमिक तपासात दिसत नाही, असे डीसीपी रत्नाकर नवले यांनी स्पष्ट केले. व्हायरल व्हिडिओतील प्रत्यक्षदर्शी संजय जाधव यांनीही तेच सांगितले. मुलाकडे आधीपासून आयफोन होता, मग एका कुटुंबावर ही वेळ का आली? नेमके त्या घरात काय घडले होते? (पान ८ वर)

## माती आणि पाणीचे संवर्धन करा- पालकमंत्री जयकुमार रावल

### मृद व जलसंधारण विभागातर्फे महा वाकॅथॉन वॉक फॉर वॉटर

**धुळे, दि.२२- माती आणि पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. याच भूमिकेतून माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी पाणी अडवा पाणी जिरवा; हा संदेश दिला होता. त्यामुळे प्रत्येकाने पृथ्वीच्या संरक्षणासाठी माती आणि पाण्याचे संवर्धन करावे, असे आवाहन राज्याचे पणन, राजशिष्टाचार तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागातर्फे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा क्रीडा संकुलात महा वाकॅथॉन वॉक फॉर वॉटरचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पालकमंत्री ना. रावल बोलत होते. यावेळी महापौर मायादेवी परदेशी, आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुप अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, मृद व जलसंधारण विभागाचे उपअभियंता जितेंद्र पाटील, भूषण गाढवे आदी उपस्थित होते. यावेळी नागरिकांना जलसंवर्धनाची शपथ देण्यात आली. तसेच यावेळी नरेंद्र अहिरे, गोकुळ पाटील, गुणवंत पवार, राहुल पाटील यांचा पर्यावरण संवर्धनासाठी उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचा जन्मदिवस २१ ऑगस्ट हा दिवस जलसंधारण दिन म्हणून साजरा करत आहोत. माती आणि पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे, (पान ८ वर)



## कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करा ना.आबीटकरांना संघटनेचे निवेदन

**धुळे, दि.२२- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत गटप्रवर्तक पदावरील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन निर्णय ३० जून २०२६ नुसार समायोजनात समाविष्ट करण्यात यावे. या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटना धुळेच्यावतीने राज्याचे आरोग्यमंत्री ना.प्रकाश आबिटकर यांना देण्यात आले.**

निवेदनात नमुद करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये गटप्रवर्तकाची (पान ८ वर)

### धुळ्यातील दोघांकडून एमडी पावडरसह दारूसाठा जप्त

धुळे, दि.२२- शहरातील पांझरा नदी किनारी एका तरुणाकडून शहर पोलिसांनी अंमली पदार्थ एमडी पावडर आणि त्याच्या साथीदाराकडून दारू साठा जप्त केला. दोघांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

शहर पोलिसांच्या पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीनुसार बुधवारी रात्री कारवाई केली. पांझरा नदी किनारी पुलाजवळ संशयित कुणाल भीमराव वारुडे याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ६९ ग्रॅम एमडी पावडर मिळाली, त्याची चौकशी केली असता अन्य संशयित दीपक शंकर कापुरे (रा. भोकर) याचे नाव सांगितले. पोलिसांनी कापुरे (पान ८ वर)

## नंदुरबार नगरपालिकेत नियमांची पायमल्ली करून स्थायीचे कामकाज हिरालाल चौधरींचा आरोप; पत्रकारांना प्रवेश नाकारल्याने सभात्याग

**नंदुरबार, दि.२२ (प्रतिनिधी)- नंदुरबार नगरपालिकेच्या कामकाजात अनेक बेकायदेशीर कामे केली जात असून, विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना डावलून अनेक निर्णय घेतले जात असल्याचा गंभीर आरोप भाजप नगरसेवकांनी केला आहे. नगरपालिका सभांचे कामकाज पारदर्शक असावे, पत्रकारांना प्रवेश देण्यात यावा आणि सभांचे चित्रीकरण करण्यात यावे, अशी मागणी करत प्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.**



नगरपालिकेतील विकासकामांसाठी दहा लाख रुपयांच्या आतील तसेच दहा लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या टेंडरसाठी ठरावीक प्रक्रिया राबविण्यात येते. मात्र, नंदुरबार नगरपालिकेत सर्व नियम डावलून सभा व कामकाज सुरू असल्याचा आरोप भाजप नगरसेवकांनी केला. सत्ताधारी नगरसेवकांकडून नियमांची पायमल्ली केली जात असून, स्थायी समितीच्या बैठकीत बेकायदेशीरपणे कार्योत्तर मंजुरी देण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले. आधी कामे करून घ्यायची आणि नंतर टेंडर मंजूर करायचे असा नवा पायंडा पाडला जात आहे. कार्योत्तर मंजुरीसाठी आवश्यक ती टिपणीही ठेवली जात नसल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे भाजप नगरसेवकांनी सांगितले. दरम्यान, सभागृहातील कामकाज बाहेर जाऊ नये, या उद्देशाने पालिका प्रशासनाने पत्रकारांना प्रवेश नाकारल्याचा आरोप (पान ८ वर)

## दारुचे भाव आता दहा पटीने वाढवा साखरेचे भाव निम्मे करा : सावजी

**मुंबई, दि. २२ : सध्या साखरेच्या दरात मोठी वाढ झाली आहे. पन्नास रुपये किलीने मिळणारी साखर सद्या ७० ते ८० रुपयांवर गेली आहे. या वाढत्या दराचा मोठा फटका ग्राहकांना बसत आहे. दरम्यान, अशातच साखरेच्या वाढत्या भावासंदर्भात माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मागणी केली आहे. साखरेचे भाव निम्म्यावर आणून दारुचे भाव दहा पटीने वाढवा, अशी मागणी सावजी यांनी केली आहे. सद्या त्यांच्या या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू आहे.**



देशभरात साखरेच्या भावात मोठी वाढ होत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खर्चावर ताण पडत आहे. शिवाय, आगामी सणासुदीचे दिवस असल्याने सरकारने महसूल वाढवण्यासाठी दारूच्या किमतीत दहा पटीने वाढ करावी, साखरेचे भाव निम्म्यावर आणावे, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी (पान ८ वर)

### कात्री-तोरखापाड्यात चारा लागवड मोहिम

मोलगी, दि.२२ (प्रतिनिधी)- सातपुड्याच्या दुर्गम भागातील पशुपालक आणि शेतकऱ्यांसाठी भविष्यात चारा उपलब्धतेची शाश्वती निर्माण करण्याच्या उद्देशाने कात्रीतोरखापाडा परिसरात लोकसहभागातून चारा लागवड मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

कर्नाटकातील धारवाड येथून आलेल्या चारा संशोधन क्षेत्रातील शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन, कृषी विज्ञान केंद्र नंदुरबारचे शास्त्रज्ञ, अक्कलकुवा व धडगाव वनविभागाचे वनक्षेत्रपाल , तसेच धडगाव कृषी विभागातील पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चारा लागवडीला सुरुवात करण्यात आली. (पान ८ वर)

## हिरे वैद्यकीय रुग्णालयात पी.जी. डॉक्टरांकडून अरेरावी रूग्णांची हेळसांड थांबवा- शिवसेनेचे अधिष्ठातांना साकडे



**धुळे, दि.२२- महाराष्ट्र राज्य वैद्यकीय तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने नुकतीच रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अजित पाठक यांची हिरे वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठाता पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या निमित्ताने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने डॉ.अजित पाठक यांचा सत्कार करण्यात येवुन गेल्या अनेक वर्षापासून वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात अनेक समस्या या अद्यापही सुटलेल्या नसून प्राधान्याने येणाऱ्या काळात त्या सोडवाव्यात व रुग्णांची होणारी हेळसांड थांबविण्यासाठी प्रयत्न करावे अशी अपेक्षा निवेदन द्वारे व्यक्त करण्यात आली.**

निवेदनात नमुद केले आहे की, सिटीस्कॅन मशीन उपलब्ध होऊ नये अद्यापही कार्यान्वित नसल्याने ते कधी सुरू होणार ? सोनोग्राफी विभाग (पान ८ वर)

### मनपातर्फे एकल महिलांच्या नोंदणीसाठी विशेष अभियान

धुळे, दि. २२- महाराष्ट्र राज्यातील एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत एकल महिला मसुदा समिती गठीत करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी करण्याचे निर्देश प्राप्त झाले असून, त्यानुसार धुळे महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागामार्फत दि. १७ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत एकल महिलांच्या नोंदणीसाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील एकल महिलांचा सर्वांगीण विकास, तसेच त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून (पान ८ वर)

## एलसीबीने चौगाव येथील बनावट दारुचा कारखाना केला उध्वस्त

**धुळे, दि.२२- चौगाव शिवारात साल्या-माल्या डोंगराच्या पायथ्याशी बनावट दारूचा कारखाना स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी उद्ध्वस्त केला. घटनास्थळावरून संशयित बेपत्ता झाला असून पोलिसांनी सुमारे ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार चौगाव शिवारात डोंगर पायथ्याशी शेतात कांदाचाळ जवळ बेकायदेशीररित्या बनावट विदेशी दारु अवैधरित्या तयार होत असल्याची माहिती मिळाली. स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने छापा टाकला. विशाल दगडु गोऱ्हेकर (गवळी), (रा. धुळे) याच्या ताब्यातील एका खोलीत मानवी जीवितास धोका उत्पन्न होईल अशी बनावट दारुसाठा होता. खोलीची तपासणी केली असता बनावट दारु बनविण्याचे साधन व साहित्य हस्तगत करण्यात आले. तत्पूर्वी संशयित घटनास्थळावरून प्रसार झाला होता. पोलिसांनी ११ हजार ७५० रुपयांचे बनावट दारु भरलेल्या एकुण ४७ बाटल्या, १५ हजारांचे बाटलीचे बुच पॅकींग मशिन, ६ हजारांचे ५०० रुपयांचा स्टिलचा पिंप, त्यात २३ लीटर बनावट दारुचे द्रावण, बुच (कॅप) बनावट दारु तयार करण्यासाठीचा रंग, ३ हजार ६५५ रुपयांच्या देशी दारुच्या प्लॉस्टीकच्या बाटल्या, प्लॉस्टिक बादली, चार प्लॅस्टिक ड्रम, पाण्याचा जार, प्लॅस्टिक ट्रे, नरसाळे, मग, हॅक-सॉ ब्लेड, मोजपात्र, गाळणी व पारदर्शक नळी, असा एकूण ४४, हजार ७८१ रुपयांचा हस्तगत मुद्देमाल केला.

संशयित विशाल गोऱ्हेकर याच्या खोलीतील मानवी जीवितास अपायकारक व घातक ठरेल अशी बनावट रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्की तयार करण्याचा कारखाना उध्वस्त केला. रुन, धुळे तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (अ) (ब) (क) (ई), ६७ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात झाला. बेपत्ता विशाल गोऱ्हेकर (गवळी) याचा शोध घेण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे (पान ८ वर)

## स्व. बाळासाहेब ठाकरे जलतरण तलावाचे दर निश्चित अधिक शुल्क आकारले जात नाही; पालिकेचे स्पष्टीकरण

**नंदुरबार, दि.२२ (प्रतिनिधी)- शहरातील स्व. बाळासाहेब ठाकरे जलतरण तलावाच्या देखभाल, दुरुस्ती व संचालनासाठी आकारण्यात येणाऱ्या विविध शुल्कांचे दर निश्चित करण्यात आले असून, निश्चित दरापेक्षा अधिक शुल्क नागरिकांकडून घेतले जाणार नसल्याचे स्पष्टीकरण नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी, उपनगराध्यक्ष प्रथमेश चौधरी व मुख्याधिकारी राहुल वाघ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.**

याबाबत पालिकेने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, जलतरण तलावासाठी निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार कुटुंब (पती-पत्नी तसेच १८ वर्षांखालील २ मुले) यांच्यासाठी वार्षिक सभासद शुल्क १५,०००, प्रौढांसाठी वार्षिक सभासद शुल्क ७,०००, तर लहान मुलांसाठी ५,००० आहे. मासिक प्रवेश शुल्क प्रौढांसाठी १,५००, तर लहान मुलांसाठी १,३०० निश्चित करण्यात आले आहे.

तसेच प्रवेश शुल्क प्रति वर्ष ३००, नूतनीकरण शुल्क वार्षिक १०० व मासिक ८०, नुकसानभरपाई दंड ५००, ओळखपत्राची दुसरी प्रत १००, तर चाचणी शुल्क १०० असे दर निश्चित आहेत.

आकस्मिक तिकिटासाठी प्रौढ व लहान मुलांसाठी प्रति तास ८२, वार्षिक/मासिक सभासद प्रवेश अर्जासाठी ५० शुल्क आकारण्यात येणार आहे. चित्रिकरणासाठी १ तासाकरिता ८,०००, तर हिंदी/मराठी चित्रपट चित्रिकरणासाठी प्रतिदिन १२,००० शुल्क निश्चित करण्यात आले आहे. क्रीडा स्पर्धा (शासकीय/निमशासकीय/निवड चाचणी) ३ तासांकरिता ५,००० शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

जलतरण तलावाच्या शुल्काबाबत नागरिकांमध्ये कोणताही संभ्रम राहू नये यासाठी अधिकृत दरपत्रक जाहीर करण्यात आले असून, दरपत्रकात नमूद केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारली जात नसल्याचे नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी, उपनगराध्यक्ष प्रथमेश चौधरी व मुख्याधिकारी (पान ८ वर)




## आ.राम भदाणेंच्या वाढदिवसानिमित्त भटाई माता मंदिरात महाआरती संपन्न

**धुळे, दि.२२- ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण असणारे, शेतकऱ्यांच्या बांधावर धावणारे बुलंद नेतृत्व आमदार राम भदाणे यांचा वाढदिवस धुळे ग्रामीणमध्ये विधायक अभियानाने साजरा करण्यास आजपासून सुरुवात झाली. सकाळी कुलस्वामिनी भटाईमाता मंदिरात महाआरती करून सेवा सप्ताह अभियानाचा श्रीगणेशा झाला. दिवसभर शुभेच्छांचा वर्षाव सुरु होता. विधायक समाजसेवी उपक्रमांची प्रत्येक गावात** (पान २ वर)

## सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती प्रसन्नकुमार वराळेंचा व्हॉलंटरी महिला मंडळ संस्थेकडून विशेष सत्कार

**शहादा, दि.२२ (का.प्र.)- कर्नाटक उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि सध्या दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्नकुमार वराळे यांचा व्हॉलंटरी महिला मंडळ संस्थेच्या वतीने भावनिक वातावरणात विशेष सत्कार व सन्मान करण्यात आला.**

धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथील नवीन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन करण्यासाठी न्यायमूर्ती वराळे आले असता संस्थेचे सचिव डव्होकेट



राजेश कुलकर्णी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन हा सत्कार केला.या सन्मानाप्रसंगी व्हॉलंटरी महिला मंडळाच्या वतीने न्यायमूर्ती प्रसन्नकुमार वराळे यांना त्यांच्या प्राथमिक शाळेच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची (एलसी) द्वितीय सत्यप्रत, सन्मानचिन्ह सप्रेम भेट म्हणून देण्यात आले. आपली जुनी शाळा आणि तिच्याशी जोडलेल्या आठवणींचा हा ऐतिहासिक दस्तावेज पाहून न्यायमूर्ती वराळे अत्यंत भावुक झाले.सन १९७० च्या दरम्यान न्यायमूर्ती प्रसन्नकुमार वराळे यांचे वडील न्यायमूर्ती भालचंद्र वराळे हे शहादा न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. त्या काळात प्रसन्नकुमार वराळे यांनी व्हॉलंटरी महिला मंडळाच्या प्राथमिक शाळेत प्राथमिक (पान ८ वर)

## व्यावसायिक तरुणासह दोघांवर पाच जणांचा प्राणघातक हल्ला

**धुळे, दि.२२- शहरातील पारोळा रोड चौफुलीजवळ व्यावसायिक तरुणासह त्याच्या मित्रावर पाच जणांनी हल्ला केला. त्यात दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल केले. जखमी व्यावसायिक जयेश दुसाने यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार राजेंद्र जीवनलाल बंब याच्या विरूध्द तक्रार दिली होती. त्यावरूनच त्यांच्यावर हल्ला झाल्याचा संशय आहे. पोलीस चौकशीत त्याचा उलगडा होईल.**

बिल्डींग मटेरीअल सप्लायर जयेश उमाकांत दुसाने (वय ३७, रा. ३, काझी प्लॉट, ८० फुटी रोड, धुळे) यांनी फिर्याद दिली, त्यानुसार मित्र गजानन मच्छींद्र शिंदे याचेसह मोटार सायकल क्र.एम एच १८/एएस-२६०५ नालंदा हॉटेल आग्रा रोड येथे जात होते. नऊ ऑगस्टला रात्री पावणे अकराच्या सुमारास पारोळा चौफुलीजवळ फिर्यादी व त्याचा मित्र गजानन शिंदे याला रस्त्यात अडविले. शिवीगाळ, दमदाटी करून संशयितांनी लाकडी दांडा व काहीतरी धारदार वस्तुने मारहाण केली. (पान २ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,46,600 रु.+3% GST
सोने- 24 K -1,60,000 रु.+3% GST
चांदी- 2,50,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

### अवैध व्यवसायांवर कारवाई करा-सेना

धुळे, दि. २२- शिंदखेडा तालुक्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या विविध प्रकारच्या कथित अवैध व्यवसायांवर पोलीस आणि संबंधित प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन शिवसेनेचे धुळे जिल्हा प्रमुख शाहणा सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली शिंदखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले. शहरासह शिंदखेडा तालुक्यातील वातावरण सर्वसामान्यांसाठी सुरक्षित राहण्यासाठी महसुल आणि पोलिस प्रशासनाने संयुक्त पथक निर्माण करून कारवाई करावी, अशी (पान २ वर)

## बंदीजनांमधील चांगुलपणाला नाटकाच्या माध्यमातून साद- कारागृह अधीक्षक श्रीमती मुगुटरावांचे प्रतिपादन

**नाशिक दि.२२ (प्रतिनिधी) - कारागृहातील बंदीजनांना मानवतेची शिकवण देवून इथेच टाका तंबू या नाटकाने त्यांच्यातील चांगुलपणाला, माणूसपणाला साद घातल्यानेच आज या नाटकाला या बंदीजनांचा इतका भरभरून प्रतिसाद मिळाला आहे, असे प्रतिपादन नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षक तथा उपमहानिरीक्षक श्रीमती अरूणा मुगुटराव यांनी केले.**




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे ललित कला केंद्र आणि पूर्वशिक्षण मान्यता मूल्यांकन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने इथेच टाका तंबू या नाटकाचा प्रयोग नाशिकरोड येथील मध्यवर्ती कारागृहात उदंड प्रतिसादात संपन्न झाला. त्याप्रसंगी श्रीमती मुगुटराव (पान २ वर)

### गंगोत्री फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण कार्यक्रम

शहादा, दि.२२ (प्रतिनिधी)- पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गंगोत्री फाउंडेशनतर्फे शहरातील विश्राम काका पाटील शैक्षणिक संकुलाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वाढते प्रदूषण, तापमान आणि पर्यावरणाचा असमतोल लक्षात घेता अधिकाधिक वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गंगोत्री फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रिती पाटील यांनी केले.

येथील गंगोत्री फाउंडेशनच्या वतीने कै.डॉ.विश्राम काका पाटील शैक्षणिक संकुलाच्या परिसरात विविध रोपांची लागवड फाउंडेशनच्या (पान २ वर)

## पान १ वरुन

## महिला स्वतंत्र राहू नये, हा मनुस्मृतीचा डाव

असे राहुल गांधी यावेळी म्हणाले. पुरुषांपेक्षा महिलांना पंचवीस टक्के पगार कमी मिळतो. सुमारे ८४ टक्के महिलांना काम करण्यासाठी परवानगी घ्यावी लागते. महिलांना सन्मान मिळत नसल्याचे राहुल गांधी म्हणाले. मोठ्या प्रमाणात हिंसेच्या घटना घडत आहेत. अत्याचाराच्या घटना घडत आहे.

**आंदोलन स्थळी बोलवा : राहुल गांधी**

छात्रों की गुंजच्या पुण्यातील कार्यक्रमात राहुल गांधी यांनी तरुणाईला संबोधित केले. राहुल गांधी यांच्यासमोर निशा नावाच्या विद्यार्थिनीने आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्या मांडल्या. आदिवासी विद्यार्थ्यांचे मांजरीत उपोषण सुरु असल्याचे निशाने सांगितले. यावेळी आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे निवेदन तिने राहुल गांधी यांच्याकडे सोपवले. माझी गोष्ट ही फक्त एका निशाची नाही, सर्व आदिवासी विद्यार्थ्यांची, संपूर्ण देशाची आणि महाराष्ट्राची असल्याने मराठीत मांडत असल्याचे, निशाने सांगितले. आंदोलन स्थळी का बोलवत नाही, असे विचारले असता निशाने त्यांना आमंत्रण दिले. यावर राहुल गांधी यांनी निशाला मी तिथे येतो. यामुळे दबाव वाढेल, असे म्हटले. आंदोलन स्थळी मला बोलवा, मी येईन, असे राहुल गांधी म्हणाले. मी तिथे येतो. यामुळे दबाव वाढेल, असे राहुल गांधी म्हणाले.

महिला भारताची ताकद

पुण्यातील स्वागतासाठी राहुल गांधी यांनी आभार मानले. राहुल गांधी यांनी भारतातील महिला या देशाचे सर्वात मोठे सामर्थ असल्याचे म्हटले. भारतात महिलांच्या नावावर स्वतंत्रपणे आठ टक्के मालमत्ता असल्याचे देखील त्यांनी म्हटले. भारतातील ७० कोटी महिलांची स्वप्ने आणि त्यांचा प्रवास हे आपल्या देशाचे वैभव आहे, असेही त्यांनी म्हटले. या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी त्यांची मते देखील मांडली.

## आ.राम भदाणेंच्या वाढदिवसानिमित्त

**उत्साही धामधुम सुरु होती.**

भटाई माता मंदिरात भाजप पदाधिकाऱ्यांनी महाआरती करून आमदार रामदादा भदाणे यांचा अभिष्टचिंतन सोहळा साजरा केला. कार्यकर्त्यांनी ममाझा नेता माझा अभिमानफ या अभियानांतर्गत संपूर्ण तालुकाभर सामाजिक उपक्रमांना सुरुवात केली. आमदार राम भदाणे यांनी वाढदिवसाला हार-तुरे नको, तर विधायक काम करा, असे आवाहन केले होते. या आवाहनास प्रत्येक गावातून मोठा प्रतिसाद मिळाला.

**तालुकाभर विधायक उपक्रमांची मांदियाळी**

कापडणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप झाले. निमखेडी, विसरणे, निकुंभे, बिलाडी, रतनपुरा, फागणे मंडळ, मुकटी गणात मिळून हजारो विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व इतर शालेय साहित्याचे वितरण झाले. नावरा-नावरी येथे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रा. अरविंद जाधव यांनी महादेव मंदिरात अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन केले होते. कापडणे येथे पर्यावरण संवर्धनासाठी लक्ष्मण माळी व तुषार माळी यांनी रामनगर व भवानी माता चौकात वृक्षारोपण केले. कुसुंबा येथे राजेंद्र शिंदे व किशोर शिंदे यांनी अन्नदान सोहळा, उडाणे येथे नानाभाऊ वाघ व माजी सरपंच विठ्ठल बागुल यांनी संस्कार मतिमंद शाळेत अन्न वाटप केले.

**रक्तदान शिबीर**

धुळे तालुक्यातील विविध गावांमध्ये रक्तदान शिबीरांना सुरुवात झाली. या सेवा सप्ताहात पंचवीसपेक्षा अधिक गावांमध्ये रक्तदान शिबीर होणार आहेत.

**जनसेवेचा महोत्सव**

या अभियानामुळे आमदार राम भदाणे यांचा वाढदिवस हा केवळ सोहळा न राहता, जनसेवेचा महोत्सव होत चालला असल्याच्या प्रतिक्रीया सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्यात.

## व्यावसायिक तरुणासह दोघांवर

मारहाणीत जयेश दुसाने, त्याचा मित्राला दुखापत झाली. त्यांना रुग्णालयात दाखल केले उपचार घेतल्यानंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली. त्यानंतर जयेश दुसाने यांनी आझाद नगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून संशयित अज्ञात पाचही जणांविरुद्ध कलम १८९ (१) (२).१९१(२) (३),१२६(२),११८(१),११५ (२), ३५२,३५१ (२) (३) प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

**तक्रार केल्याने मारहाण ?**

जयेश दुसाने याने राजेंद्र जीवनलाल बंब याच्या विरूध्द तक्रार दिली होती. त्या तक्रारीचा राग मनात ठेवून जयेश दुसाने व मित्राला मारहाण केल्याचा संशय व्यक्त होत आहे. राजेंद्र बंब याने मारण्यासाठी अज्ञात तरुणांना पाठवले आहे, याबाबत फिर्यादी जयेश दुसाने यांना संशय असुन त्याचीही चौकशी व्हावी, असेही फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार नितीन पाटील तपास करीत आहेत.

## अवैध व्यवसायांवर कारवाई करा-सेना

मागणी शाहणा सोनवणे यांनी केली आहे. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख शाहणा सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलिस प्रशासनास निवेदन दिले. निवेदनात नमूद केल्यानुसार, तालुक्यात अनेक ठिकाणी कथित अवैध दारू विक्री, वाळू उत्खनन, गौण खनिजांची चोरी, मटका-जुगार केंद्र, पत्त्यांचे क्लब, अवैध सावकारी, अतिक्रमण करीत अवैध व्यवसाय करणे, परवानगी शिवाय पेट्रोल-डिझेल विक्री करणे, असे व्यवसाय केले जात आहेत. याशिवाय बनावट बियाणे आणि खतांची विक्री, अवैध वृक्षतोड, अंमली पदार्थांची विक्री तसेच विनापरवाना चालणारे स्क्रॅप व्यवसाय, गोदामे आणि इतर उद्योगधंदे सुरू असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. या कथित अवैध व्यवसायांमुळे शासनाचा महसूल बुडत असून पर्यावरणाची हानी होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या प्रकारांमुळे तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या गर्तेत ढकलली जात असून, प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या नागरिकांवर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. शिंदखेडा तालुक्यात हे प्रकार उघडपणे सुरू असल्याच्या तक्रारी असतानाही संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई का केली जात नाही, असा प्रश्न शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित अन्य यंत्रणांचे संयुक्त पथक स्थापन करून तालुक्यातील सर्व कथित अवैध व्यवसायांविरोधात व्यापक मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## देशप्रेम आणि वंदे मातरमचा प्रश्न ......

**✻ जन मानस ✻**

आपल्या देशावर प्रेम करणे ही एक स्वाभाविक भावना आहे आणि मुस्लिम समाजही आपल्या मातृभूमीवरील प्रेमाला आपल्या धार्मिक व नैतिक जाणिवांच्या विरोधात मानत नाही. भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासावर नजर टाकली तर हे स्पष्ट होते की मुसलमानांनीही या देशाच्या स्वातंत्र्यासाठी असंख्य आणि अतुलनीय बलिदाने दिली आहेत. अनेक उलेमा, स्वातंत्र्यसैनिक, राजकीय नेते आणि सामान्य मुस्लिम नागरिकांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि तुरुंगवासासह अनेक प्रकारच्या यातना सहन केल्या. अनेकांनी आपले प्राण अर्पण केले जेणेकरून पुढील पिढ्यांना स्वतंत्र वातावरणात जीवन जगता यावे.

म्हणून एखादा मुस्लिम वंदे मातरम म्हणण्यास टाळतो म्हणून त्याला आपल्या देशावर प्रेम नाही असा समज योग्य नाही. देशप्रेम आणि एखाद्या विशिष्ट घोषणा किंवा गीताचे उच्चारण करणे या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. एखाद्या व्यक्तीच्या देशभक्तीचे मोजमाप केवळ त्याने एखादी विशिष्ट घोषणा केली किंवा नाही यावर करता येणार नाही. त्याचे आचरण, देशाच्या संविधान व कायद्याचा आदर, राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्याचे योगदान आणि देशाच्या प्रगती व सुरक्षेसाठी त्याच्या सेवा या अधिक महत्त्वाच्या बाबी आहेत.

मुस्लिम आपल्या देशावर प्रेम करतो, देशाच्या सुरक्षिततेसाठी आणि प्रगतीसाठी प्रार्थना करतो, संविधान व कायद्याचा आदर करतो आणि देशाच्या विकासात आपले योगदान देतो. परंतु एखाद्या धार्मिक किंवा श्रद्धाविषयक कारणामुळे तो विशिष्ट धार्मिक आशय असलेल्या घोषणेच्या किंवा गीताच्या काही भागांचे उच्चारण करण्यास टाळत असेल तर केवळ त्या कारणावरून त्याच्या देशप्रेमावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे हे न्यायाच्या तत्त्वांविरुद्ध आहे.

येथे एक मूलभूत तत्त्व समजून घेणे आवश्यक आहे की देशाशी निष्ठा राखणे म्हणजे स्वतःची धार्मिक ओळख आणि श्रद्धा सोडून देणे नव्हे. भारत हा बहुधार्मिक, बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक देश आहे. त्याचे वैशिष्ट्य आणि सौंदर्यच त्याच्या विविधतेमध्ये आहे. येथे प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे पालन करण्याचा आणि आपल्या श्रद्धेनुसार जीवन जगण्याचा अधिकार असला पाहिजे. विविध धर्म आणि समाजघटकांनी एकमेकांच्या धार्मिक भावना तसेच मूलभूत अधिकारांचा आदर केला तरच राष्ट्रीय एकात्मता अधिक मजबूत होऊ शकते.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मुसलमानांनी केवळ प्रेक्षकाची भूमिका बजावली नव्हती तर त्यांनी प्रत्यक्ष आणि सक्रिय सहभाग घेतला होता. उलेमांनी ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध आवाज उठवला, जनतेमध्ये जागृती निर्माण केली आणि स्वातंत्र्याच्या चळवळीत अनेक बलिदाने दिली. हजारो मुसलमान तुरुंगात गेले, त्यांनी आपली संपत्ती, सुखसोयी आणि आरामाचा त्याग केला आणि अनेकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राणही अर्पण केले.

आजही प्रत्येक मुस्लिम भारताचा जबाबदार नागरिक म्हणून देशाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देऊ शकतो आणि दिले पाहिजे. शिक्षण, विज्ञान, उद्योग, व्यापार, संरक्षण, प्रशासन, सामाजिक सेवा तसेच इतर विविध क्षेत्रांमध्ये आपल्या क्षमता देशाच्या सेवेसाठी अर्पण करता येतात. देशप्रेम केवळ भावनिक घोषणांपुरते मर्यादित नसावे. प्रामाणिकपणे आपली कर्तव्ये पार पाडणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे, गरजूंची मदत करणे, द्वेष आणि हिंसाचारापासून दूर राहणे तसेच समाजात शांतता, बंधुभाव आणि सौहार्द निर्माण करणे हीदेखील देशप्रेमाचीच व्यावहारिक रूपे आहेत.

म्हणून एखाद्या मुस्लिमाने वंदे मातरम न म्हणणे आणि त्याचे आपल्या देशावर प्रेम असणे या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. एखाद्या विशिष्ट घोषणेशी असलेल्या मतभेदाला देशद्रोहाचे स्वरूप देणे हा अनावश्यक आणि धोकादायक गैरसमज आहे. मतभेदाला शत्रुत्वाचे नाव देण्याऐवजी आपण एकमेकांच्या भावना, धार्मिक स्वातंत्र्य आणि संविधानिक अधिकारांचा आदर केला पाहिजे.

भारताची खरी शक्ती त्याच्या विविधतेत, परस्पर आदरात आणि सामायिक राष्ट्रीय जीवनात आहे. या देशाला अशा वातावरणाची गरज आहे जिथे मुस्लिम आपल्या इस्लामी श्रद्धा आणि धार्मिक मूल्यांसह एक निष्ठावान भारतीय नागरिक म्हणून सन्मानाने जीवन जगू शकेल आणि इतर धर्मांचे अनुयायीही आपल्या श्रद्धेनुसार स्वातंत्र्याने जीवन जगू शकतील.

देशप्रेम ही हृदयातील भावना आहे; ती कोणत्याही एका घोषणेवर अवलंबून नसते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मुसलमानांनी दिलेली बलिदाने हा इतिहासाचा अविभाज्य भाग आहेत. आजही प्रत्येक देशप्रेमी मुस्लिम आपल्या मातृभूमीची सुरक्षितता, प्रगती, समृद्धी, शांतता आणि स्थैर्य यासाठी सदैव इच्छुक आहे.

**सय्यद आरिफ अली रजवी**
**कल्याण(माजी प्राचार्य, अँग्लो उर्दू हायस्कूल, कल्याण)**

## शेतीवर कब्जा मिळवण्यासाठी हल्ला परस्परांवर गुन्हा;बावीस अटकेत

**शिरपूर दि.२२ (का.प्र.) : तालुक्यातील पळासनेर गावाजवळ चत्तरसिंग पाडा येथे शेती ताब्यात घेण्याच्या उद्देशाने दोन गटांत तुफान हाणामारी झाल्याची घटना १८ ऑगस्टला रात्री साडेअकराला घडली. याबाबत दोन्ही गटांनी परस्पराविरोधात दिलेल्या फिर्यादीवरुन सुमारे २३ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. २२ संशयितांना अटक केली असून त्यांना न्यायालयीन कोठडी देण्यात आली.**

मुखी चत्तरसिंह पावरा (वय ६२, रा.चत्तरसिंह पाडा) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्याची शेती बळकावण्यासाठी संशयित नारसिंह पावरा, पारसिंह पावरा, रामदास पावरा, रामज्या पावरा, भियासिंह पावरा, गंगाराम पावरा, तुकाराम पावरा, पिताराम पावरा, नानाराम पावरा, जगन पावरा, मगन पावरा, रवींद्र पावरा, नरसिंह पावरा (सर्व रा.चत्तरसिंह पाडा) यांनी हल्ला करुन लाठ्या-काठ्या, कुऱ्हाडी, तीरकामठे व तलवार घेऊन हल्ला केला. मुखी पावरा याच्या घरावर दरोडा घालून चार लाख ९० हजार रुपये किंमतीचे चांदीचे दागिने व ३५ हजार रुपये रोख असा एकूण पाच लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल त्यांनी लुटला.

याच प्रकरणात रामज्या संत्रा पावरा (वय ५०) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, संशयित बाहदऱ्या पावरा, मुखी पावरा, राजाराम पावरा, सखाराम पावरा, बिलरसिंह पावरा, गुलाब पावरा, सुमाऱ्या पावरा, पठाण पावरा, सुरेश पावरा (सर्व रा.चत्तरसिंह पाडा) व अनिल पावरा (रा.दुर्बड्या ता.शिरपूर) यांनी संघटितरित्या हल्ला चढवून चार लाख ३४ हजार रुपये किंमतीचे चांदीचे दागिने, ५७ हजार रुपये रोख व ५७ हजार रुपयांची रोकड असा चार लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटला. दोन्ही गटापैकी एकूण २२ जणांना अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयीन कोठडी देण्यात आली. उपनिरीक्षक हेमंत खैरनार तपास करीत आहेत.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**




## बी.ए.आय.स्फूर्ती विंग व मनपातर्फे शहरात पंधरा फूटांच्या वृक्षांचे रोपण

**धुळे, दि.२१- बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे (बीएआय) धुळे सेंटर आणि धुळे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे शहरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा विशेष वृक्षारोपण प्रथमच १५ फूट उंच बकुळ वृक्षाचे रोपण वीर सावरकर स्मारकाजवळ, पांझरा नदी किनारी, देवपूर, धुळे येथे करण्यात आले.**

या वृक्षारोपण प्रसंगी मनपा आयुक्त नितीन कापडणीस तसेच बी.ए.आय.धुळे यांच्या शुभहस्ते तसेच बी.ए.आय. धुळेचे सर्व माजी अध्यक्ष, सदस्य व स्फूर्ती विंग सदस्य उपस्थित होते.बी.ए.आय. स्फूर्ती विंग चेअरपर्सन शीतल मुंडके, बी.ए.आय. धुळेचे चेअरमन इंजि. अक्षय मुंडके यांच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमामागे शहराच्या विकासासोबतच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा उद्देश आहे. या उपक्रमासाठी झाडांसाठी देणगी देणाऱ्या बी.ए.आय. सदस्य, शिनकर पतपेढी यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमा वेळी शहर अभियंता चंद्रकांत ओगले, पाटकरी, राजेंद्र माइनकर, जकातदार व इतरही महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

या यशस्वी उपक्रमासाठी चेअरमन इंजि. अक्षय मुंडके, शीतल मुंडके, सचिव आनंद बाळापुरकर, सुचेता बाळापुरकर, उपाध्यक्ष दीपक शेलार, वर्षा शेलार, किशोर आप्पा पाटील, माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील मुंदडा, नितीन खिवसरा, संजय पाटील, माजी राज्याध्यक्ष भारत वाघ, कुणाल सोनार, सहसचिव संदीप सैंदाणे, रागिणी सैंदाणे , खजिनदार शेषराज जाधव, सारिका जाधव, गोपाल शर्मा, राहुल कुलकर्णी, पंकज ब्राह्मणकर, सचिन सनेर, अजिंक्यशर्मा,जगदीश तनेजा, अविनाश थोरात, अंकित भंडारी, भूषण चव्हाण, देवेंद्र कट्यारे, राजेश वाणी, विलास विसपुते, दिपक जैन, अनुराग चांडक, कुंदन देवरे, तुषार आढावे, कुणाल नाशिकर , राहुल बागूल,सागर गर्ग, अक्षय ईसाई, कांतीलाल वडनेरे, यांच्यासह कार्यक्रमा साठी सर्व माजी चेअरमन मोहन गिंदोडीया, जिवराज ओसवाल, विजय चांडक, विजय भादलिकर, प्रल्हाद गरुड, पुंडलिक सुतार, , संजय देसले, शितल नवले, दीपक अहिरे आणि आशिष अग्रवाल या सर्व माजी अध्यक्षांचे मार्गदर्शन लाभले.


प्रकाश में आज जलाकर राखरकर दूंगा




धर्मेंद्र अनिताराज गोविंदा फराह शक्तीकपूर तनुजा
अनुपमखेर सदाशिव अमरापुरकर कुलभूषण


## धनादेश अनादर प्रकरणी शिक्षेबाबत दाखल अपिल सत्र न्यायालयाकडुन रद्द

**साक्री, दि.२२(प्रतिनिधी)- कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांनी श्री. कन्हैय्यालाल ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित साक्री ता. साकी, जि. धुळे यांचेकडुन कर्ज घेतलेले होते सदर कर्जाच्या वसुलीपोटी दिलेला धनादेशचा अनादर झालेला होता त्यामुळे पतसंथेने कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांचेविरूध्द चलनक्षम दस्तऐवजाचा कायदा मधील कलम १३८ अन्वये साकी न्यायालयात तक्रार दाखल केली. त्यात कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांना शिक्षा झालेली होती त्याविरूध्द कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांनी धुळे येथील मा. सत्र न्यायालयात अपिल दाखल केलेले होते.**

सदर अपिलात श्री. कन्हैय्यालाल ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित साक्री ता. साक्री, जि. धुळे यांचेवतीने अॅड. नितिन लक्ष्मण रायते यांनी युक्तीवाद केला आणि त्यात त्यांनी कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांनी पतसंस्थेकडुन दि. १४/२/२००२ रोजी घेतलेले रक्कम रु.५०,०००/-चे कर्ज व त्यावरील व्याजाची अपेलंट यांनी नियमीत फेड न केल्याने सदर कर्ज थकीत झाले होते. सदर कर्जाचे फेडीसाठी कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांनी पतसंस्थेला स्वतः सही करून चेक दिलेला होता सदच चेक वटविण्यास टाकला असता असता सदरचा चेक फंडस इनसफिशिअंट अश्या शेऱ्यासह पतसंस्थेला यांना परत मिळाला. त्यानंतर पतसंस्थेने कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांना वकीलांमार्फत चेकची रक्कम देणेबाबत रजि. नोटीस पाठवली सदरची रजि. नोटीसची मिळूनही कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांनी पंधरा दिवसाचे आत पतसंस्थेला सदर अनादर झालेल्या चेकची रक्कम दिलेली नाही त्यामुळे पतसंस्थेने कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांचेविरूध्द तक्रार दाखल केलेली होती सदर तक्रार पतसंस्थेने पुराव्यानिशी सिध्द केलेली होती आणि त्यात कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांना शिक्षा झालेली होती त्याविरूध्द कर्जदार फिरोजखान हिदायतखान पठाण यांनी धुळे येथील मा. सत्र न्यायालयात अपिल दाखल केलेले अपिल रदद करावे असा युक्तीवाद केला त्यानंतर मा. सत्र न्यायालयाने सदरचे अपिल रदद करण्यात आलेले आहे.

सदर अपिलात श्री.कन्हैय्यालाल ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित साक्री ता. साक्री, जि. धुळे यांचेतर्फे अॅड. नितिन लक्ष्मण रायते, धुळे यांनी युक्तीवाद केला आणि त्यांना अॅड. योगेश सावळे, अॅड. अतुल अहिरे, अॅड. संग्राम भोसले आणि अॅड. राहुल पाटील यांनी सहकार्य केले.

## पान १ वरुन

## बंदीजनांमधील चांगुलपणाला नाटकाच्या माध्यमातून

बोलत होत्या. यावेळी मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पूर्वशिक्षण मान्यता मूल्यांकन केंद्राचे संचालक डॉ. राम ठाकर, तुरुंगाधिकारी नेहा गुजराथी, शिक्षक बालाजी मेहेत्रे, श्री. पोतदार यांच्यासह कारागृहाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


याप्रसंगी मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की घडलेली चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आदर्श विचारांचा अवलंब करणे आवश्यक असते. या नाटकातील चोरही कवीवर्य नारायण सुर्वे यांच्या कविता वाचून पश्चातापदग्ध होऊन जीवनाची चांगली वाट निवडतो. हे बंदीजनांनाही शक्य आहे. विद्यापीठाचे काम शिक्षण आणि समाजशिक्षण देणे हे आहे. आम्ही हे नाटक त्यासाठीच निर्माण केले आहे. जे आज तुमच्यापर्यंत विद्यापीठाला पोहोचवता आले आहे. यावेळी बंदीजनातील काही कैद्यांनीही नाटकाबाबत प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या नाटकामुळे आम्ही बंदीवान आहोत, हेच विसरायला झाले असून चोराच्या, गुन्हेगाराच्या मनातही चांगुलपणा जागा होऊन त्याच्यात परिवर्तन होऊ शकते, हा संदेश आम्हाला मिळाला आहे, अशा आशयाच्या प्रतिक्रिया उपस्थित बंदीजनांनी व्यक्त केल्या.

कारागृहातील बंदिजनांसाठी विद्यापीठ व कारागृहातील प्रशासनाच्या माध्यमातून या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. कवीवर्य नारायण सुर्वे यांच्या निवासस्थानी चोरी करणाऱ्या चोराला ते कवीवर्य सुर्वे यांचे घर आल्याचे समजल्यावर झालेला पश्चाताप व त्यातून त्याच्यातील परिवर्तनाची विलक्षण कथा या नाटकात साकारली आहे. मुक्त विद्यापीठाच्या ललित कला केंद्राची निर्मिती असलेल्या या नाटकाचे लेखन प्रा. दत्ता पाटील यांनी केले असून दिग्दर्शन सचिन शिंदे यांनी केले आहे. या नाटकात प्रसिद्ध अभिनेते उमेश जगताप, ओंकार गोवर्धन, अश्विनी कासार, अमेय बर्वे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

## गंगोत्री फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण कार्यक्रम

अध्यक्षा प्रीती पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी संस्थेचे तज्ञ संचालक प्रा.एस.पी.पाटील, प्राचार्या सुरेखा पाटील, उपप्राचार्य मानवकुमार उपगडे, प्राथमिकचा मुख्याध्यापिका शोभना पाटील, विकास प्राथमिकचे मुख्याध्यापक विशाल तांबोळी, पर्यवेक्षक बी.एस.चौधरी, व्ही.ई.जावरे, व्ही.डी.चौधरी आदींसह कर्मचारी, फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते.विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. वृक्षलागवडीनंतर रोपांचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. एक व्यक्तीएक झाड या संकल्पनेतून नागरिकांनीही वृक्षारोपणासह झाडांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारावी असे आवाहन करण्यात आले.

## शब्दकोडे क्रमांक : २४३७



**आडवे शब्द :** १. माती आणि पाण्याचे मिश्रण ३. परदेश ५. झाडावर राहणारा लहान चपळ प्राणी ७.बटाटा किंवा डाळीपासून बनवला जाणारा तळलेला खाद्यपदार्थ ८.माहिती असलेले किंवा परिचित ९.शोध घेण्याची किंवा चौकशी करण्याची क्रिया ११.पोळ्या/चपात्या बनवण्याचे गव्हाचे पीठ-हिंदीत १३. मार्ग,पथ १४. जळणारा कोळसा किंवा देवाचे पवित्र भस्म १५. गालावर मारलेली चापट १८.भिस्त किंवा अवलंबून असणे २०. १००० किलोग्रॅम वजनाचे एक माप २१. मच्छर २४. गुप्त योजना किंवा कारस्थान २६.महत्त्वाची नोंद २८.नशीब, कार्य किंवा कर्म ३०. एक उंच आणि सरळ वाढणारे झाड ३१.मनाची दोलायमान अवस्था ३२.अतिलोभ किंवा हावरेपणा ३३. अधिकृत हुकूम किंवा आदेश ३५.सर्वसामान्य-हिंदीत ३६.भूगा ३७.स्वयंपाकात किंवा दिव्यासाठी वापरला जाणारा स्निग्ध पदार्थ ४०.जास्तीत-जास्त मर्यादा ४२.'माझा' या अर्थी हिंदी शब्द ४३.श्रेष्ठत्व ४६.लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी संविधानाने आपल्याला दिलेला अधिकार ४८.विजेता ४९.आक्रमण ५१.संधी किंवा योग्य वेळ ५२. वीज प्रवाह किंवा चालू घडामोडी-इंग्रजीत ५४. तग धरणे ५५.धातूवर चढवला जाणारा दुसऱ्या धातूचा थर ५६. ' ** अग्निहोत्री' एक हिंदी सिने अभिनेत्री

**उभे शब्द :** १.पोह्यांचा एक चवदार आणि तिखट-गोड फराळ २.बारीक कंकड ३.वस्तू किंवा वर्तमानपत्र वाटणारा ४. थंड ५. विशेष ६. जुन्या काळातील मोठी लाकडी किंवा धातूची पेटी १०. शरीराचा मागील भाग किंवा पुस्तकातील धडा ११. डेपो,बस वा एस टी जिथे विश्रांतीसाठी थांबते ते ठिकाण १२.हिरव्या रंगाचा आणि लाल चोचीचा पक्षी १४.अदमास १६.जंगली १७.धनी १९. साखर,पाणी यांचे मिश्रण २२.भुईमुगाच्या शेंगाच्या साली २३. पोलिसांनी टाकलेला छापा वा एखाद्या ठिकाणी दिलेली थेट-भेट २५.रायगड किल्ल्यावरील एक प्रसिद्ध टोक २७.गस्त २९.विचार ३४.वात हरणारा ३६.काकांचे नातलग ३७.बारा आणि एक मिळून तयार होणारी संख्या ३९.रान ४१.बाब ४२.इंग्रजीत-मुख्य ४३.अंतरंग ४४.चटकन रागावणारा ४५.करण्यास सुलभ असा ४७.पुरावा ४८.आजार ५०.माझे-हा शब्द संस्कृतमध्ये ५३.वर्ण

## शब्दकोडे क्रमांक : २४३६ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सो | ड | त | | खो | का | | वि | रां | ग | णा | |
| पा | | स | ह | ल | | अ | व | ग | त | | पा |
| | क | बी | र | | वि | स | र | | का | त | ळ |
| खे | च | र | | दी | वा | र | | खे | ळ | | त |
| क | रा | | बा | | ह | | ख | प | | दा | |
| डा | | स | र | स | | ओ | स | | वा | द | न |
| | जी | त | | ह | क | | ख | व | ट | | शा |
| आ | | ल | हू | | वि | रा | स | त | | तो | |
| ग | र | ज | | सा | य | न | | न | व | रा | त्र |
| गा | व | | गा | य | त्री | | पं | | ज | | य |
| डी | | ठे | | ना | | सा | ग | र | | स्व | स्थ |
| | स | व | य | | स | त | त | | ह | र | |







आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in


# बहर

## विश्वातील महान राजे



प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

# गुप्तहेर



छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे गुप्तहेर हे लष्कराचा मुख्य आधारस्तंभ होते. हेर हे अत्यंत चाणाक्ष, बुद्धीमान आणि हरहुन्नरी असत. युद्धनीतीमध्ये गुप्तहेर यंत्रणा हा स्वराज्याचा कणा होता. अचूक माहिती, वेळेचे व्यवस्थापन आणि रणनीती या जोरावर महाराजांनी बलाढ्य शत्रूंवर मात केली, ज्यामध्ये त्यांच्या गुप्तहेरांचे योगदान मोठे आहे . हेर म्हणजे स्वराज्याचा तिसरा डोळा तो अखंड उघडा आणि सावधच राहिला.छत्रपती शिवाजी महाराजांचे गुप्तहेर खाते इतके गुप्त होते की त्याची माहिती मिळणे अशक्यप्राय होते. हे गुप्तहेर शत्रू गोटातील खडान खडा माहिती मिळवित असत. छत्रपतींनी सर्व जाती-धर्मातून हुशार, बुद्धिमान, धाडसी व स्वामिनिष्ठ अशी माणसे वेचून त्यांना आपले हेर म्हणून स्वराज्यात ठेवले. स्वराज्यात गुप्तहेर खात्याला नेहमीच महत्वपूर्ण स्थान राहीले.

गुप्तहेर विभागाचे महत्त्व : गुप्तहेरांना विविध प्रकारची सांकेतिक नावे दिली जात असत. गुप्तहेर विभागाच्या माध्यमातून राजकीय व लष्करी माहिती मिळविली जात असे व ती विश्वासार्हता आजमावून घेतली जात असे. अशी माहिती गुप्तपणे मिळविली जाते व गुप्त ठेविली जाते.गुप्तहेर व्यवस्थेचे अनेक प्रकार आहेत. शासन व्यवस्थेच्या हिताच्या संदर्भात डावपेचात्मक हेरगिरी असे म्हटले जाते.महाराजांनी सर्व मोहिमा व हालचालीमध्ये कमालीची गुप्तता राखली होती. त्यामुळे महाराजांना आपली प्रत्येक मोहीम यशस्वी करता आली.

स्वराज्यातील गुप्तहेर: स्वराज्यात चार हजार गुप्तहेर होते. रामोशी समाजातील बहिर्जी नाईक हा रांगडा व हुशार तरूण स्वराज्यात दाखल झाला व गुप्तहेर खाते छत्रपतींच्या नेतृत्वाखाली अधिक ताकदवान बनले. बहिर्जी नाईक हे स्वराज्याचे गुप्त खेर विभाग प्रमुख होते.शत्रूपक्षातील माहिती काढण्यात ते पटाईत होते.बहिर्जी नाईक यांच्या माहितीवर महाराजांच्या गुप्त स्वा-यांची आखणी होत असे. हा विभाग शत्रूच्या गोठ्यात शिरून तेथील खडान खडा माहिती काढून मोहीम यशस्वी करीत असत. स्वराज्यात बहिर्जी नाईक-जाधव, बाबाजी मुगदळ, विश्वासराव नानाजी प्रभू, वल्लभदास गुजराथी, विश्वासराव दिघे, सुंदरजी प्रभुजी, विठोजी माणके, आप्पा रामोशी, अब्दुल कादर, महादेव माणके यांच्या बरोबरच नानाजी मुशेखोरेकर व कर्माजी आदि. अत्यंत कार्यक्षम गुप्तहेर होते.

वल्लभ गंगादास नावाचा व्यापारी सुरतेला हेरगिरी करीत असे. अफजलखान वध प्रकरणी विश्वासराव नानाजी प्रभू मुसेखोरेकर हे गुप्तहेर म्हणून काम करत होते. बाबाजी मुदगल यांनी शाहिस्तेखान प्रकरणाच्यावेळी हेर म्हणून काम केले होते. बहिर्जी नाईक यांनी सुरत स्वारीच्या वेळी हेरगिरी केली होती. पर दरबारात राजकीय बोलणी करण्यासाठी जाणारे स्वराज्याचे वकिल हे एक प्रकारे गुप्तहेरच होते. रघुनाथ बल्लाळ कोरडे, मुल्ला हैदर, कर्माजी, सखुजी लोहोकरे इत्यादी मंडळी महाराजाच्या वतीने पर राज्यात वकीली करण्यासाठी जात व हेरेगिरी करत. अफाट समुद्रावर तर हेरगिरी करणे किती कठीण परंतु स्वराज्यातील हेरांनी सागरी हेरेगिरीही यशस्वी केली.

गुप्तहेर रणनितीचा भाग: स्वराज्यात नंदीवाले, भटके मेढपाळ, वडार, भिका-यांचे सोंग घेतलेले हेर, ज्योतिषी, रामोशी अशा लोकांचा वापर हेर खात्यामध्ये महत्वपूर्ण ठरला. हे हेर खाते स्वराज्यातील प्रशासनाचा व रणनितीचा महत्त्वाचा भाग होते. प्रत्येक प्रसंगामध्ये हेर खात्याने आपली भूमिका योग्य पद्धतीने बजावलेली होती.

स्वत: छत्रपती शिवाजी महाराज वेषांतर करून हेर व्यवस्थेचे काम करीत असत. आग-याहून सुटका या रोमांचकारी प्रकरणात याचे प्रतिउत्तर मिळते.अफजलखान प्रकरणाच्या वेळेला त्याची छावणी वाईंला पडलेली असताना छत्रपती शिवाजी महाराजांचे एक अत्यंत विश्वासू अधिकारी विश्वासराव नानाजी दिघे यांना हेरगिरीसाठी नेमलेले होते. हे विश्वासराव फकिराचा वेश धारण करून खानाच्या छावणीत रात्रीच्या वेळी भिक्षा मागण्यासाठी जात असत. खानाच्या खलबतखान्यातील इत्यंभूत माहिती महाराजांना पुरवीत असत. त्यानुसार योजना आखल्या गेल्या व मोहीम यशस्वी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा मुक्काम ज्या ठिकाणी असे त्या परिसरामध्ये व आजूबाजूच्या रस्त्यावर गुप्तहेराचे जाळेच विणलेले असे. राजे नेहमी शास्त्रसज्ज व सुरक्षित पोशाखात असत. त्यामुळे भेटण्यासाठी आलेल्या व्यक्तीला छत्रपती विना विलंब भेट देत असत. भेटणा-या माणसाकडून उपयुक्त माहिती मिळाली म्हणजे छत्रपती त्यांना योग्य ती बक्षिसे देत असत.

सर्व समावेशक हेर यंत्रणा : छत्रपतींनी सर्व जाती-धर्मातून हुशार, बुद्धिमान, धाडसी, स्वामिनिष्ठ अशी माणसे वेचून त्यांना आपले हेर म्हणून स्वराज्यात ठेवले. स्वराज्यातील हेर काटक, कार्यक्षम, चपळ, हरहुन्नरी, वेषांतर करून बातम्या काढण्यात पटाईत असत. प्रसंगी प्राण गेला तरी स्वराज्याशी एकनिष्ठ असत.छत्रपतींनी निरनिराळ्या परिस्थितीत वेगवेगळी लष्करीनीती वापरली व यश संपादन केले.

गुप्तहेर व्यवस्थेची वैशिष्ट्ये : स्वराज्यातील हेर बैरागी, गोसावी, भिल्ल, फकीर, अपंग, पोतराज, माळी, व भिकारी आदी. वेश धारण करून हेरगिरी करीत. संन्याशांचा वापर करूनही अनेक स्वा-या यशस्वी केल्या.बहुरुप्यासारख्या कलाकृतीचा वापर गुप्तहेर म्हणून केला. स्वराज्यातील सैनिकांना दरवेशी, गोंधळी, गारुडी, भवानी या परंपरागत लोककलेचे शिक्षण दिले जात असे. स्वराज्यातील सैनिक हा परंपरागत खेळ मांडून दुस-या बाजूने चढाई करून विजय संपादन करीत असत.अचानक, अनपेक्षित आणि वेगवान हालचालीला छत्रपतींनी महत्त्व दिले व प्रत्येक मोहीम यशस्वी केली.

सक्षम व्यवस्था : छत्रपती शिवाजी महाराजांनी काळाची गरज लक्षात घेऊन गुप्तहेर खाते विकसित केले. महाराजांनी संपूर्ण भारतभर हेर पेरले होते. छत्रपतींच्या कालखंडामध्ये वाकनीस किंवा मंत्री यांना विशेषतः गुप्तहेरांकडून येणा-या बातम्यांची शाहनिशा करणे, त्यांची सत्यासत्यता पडताळून पाहणे व स्वराज्यातील अन्य घडामोडींची माहिती मिळविणे ही कामे करावी लागत.

हेरेगिरी : छत्रपतींचे गुप्तहेर शत्रू गोटात अगदी बिनदास्तपणे शिरत असत.मुघल, दक्षिणेतील शाह्या, परकीय युरोपीय यांच्या राज्यात हे हेर वेश पालटून व नावे बदलून कामाचा बहाना करून घुसत असत. हेरांनी दिलेली माहिती विश्वसनीय आहे की नाही याची चाचपणी केली जात असे.छत्रपती स्वत: ही हेर व्यवस्थेमध्ये सहभागी होत असत.छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्रा येथून स्वराज्यात येण्यासाठी जो मार्ग अवलंबिला त्यात हेर व्यवस्थेचा महत्त्वाचा वाटा होता. स्वराज्यातील अधिकारी सुध्दा उत्तम हेरेगिरी करीत असत. हेर खात्यामध्ये विविध व्यवसायातील लोक, अधिकारी, व्यापारी हे सर्वजण जशी वेळ येईल त्या पद्धतीने हेरेगिरी करून आपले काम यशस्वी करीत असत.

छत्रपती शिवाजी महाराजांचे गुप्तहेर खाते हे अत्यंत कार्यक्षम, अचूक आणि स्वतंत्र होते.स्वराज्यामध्ये बहिर्जी नाईक हे हेर प्रमुख विलक्षण, धाडसी, कल्पक व कर्तव्यदक्ष म्हणून नावाजून गेले. डोक्याला मुंडासे बांधलेले आणि खांद्यावर कांबळी टाकलेले वेगवेगळे वस्त्र परिधान केलेले हेर म्हणजे जगाच्या दृष्टीने आश्चर्य होय. स्वराज्यातील मराठा हेर जगाला धडकी बसविणारे वीर ठरले.छत्रपती आपल्या हेरांना मुबलक पगार, द्रव्य व बक्षिसे देत असत. त्यामुळे हे हेर अचूक माहिती देत असत. त्यातून छत्रपतींचे प्रत्येक धोरण यशस्वी होत असे. फ्रेंच प्रवासी ॲबेकॅरे याने महाराजांच्या कार्यक्षम हेर व्यवस्थेची माहिती दिली आहे.छत्रपतींच्या यशामध्ये हेर खात्याचा महत्त्वपूर्ण वाटा होता. स्वराज्याचे हेर खाते अप्रतिम आणि अद्वितीय असे होते.

# आपण बदलत चाललोय हेच खरं आहे..!

Contact आणि Connection....

मध्ये नेमका काय फरक ?

घटना न्यूयार्कमधील आहे. एका भारतीय साधूचे तिथे व्याख्यान झाले.

त्यानंतर पत्रकारांनी त्यांना गाठले.

त्यातील एकाने साधूला विचारलं,

''साधू महाराज, तुम्ही आताच्या व्याख्यानात संपर्क (Contact) आणि लगाव (Connection) यावर बोलला.

पण ते गोंधळात टाकणार आहे. या दोन्हीमध्ये फरक काय ?''

साधुने मंद स्मित केले अन उत्तर देण्याऐवजी वेगळेच प्रश्न त्यांनी त्या पत्रकाराला विचारणे सुरु केले.

साधू : ''तुम्ही न्यूयार्कचे रहिवासी का ?''

पत्रकार : ''येस !! का हो ?''

साधू : ''घरी कोण कोण असत?''

आपल्या प्रश्नाचे उत्तर टाळण्यासाठी साधूबाबा असं काहीतरी वेगळं विचारत आहेत असं त्या पत्रकाराला वाटलं.

कारण त्याचा प्रश्न सार्वजनिक होता अन साधू तर खाजगी काहीतरी विचारत होते.

तरी मूळ प्रश्नाचे ''उत्तर'' मिळण्याच्या आशेने तो पत्रकार उत्तर देत गेला.

तो म्हणाला : ''माझी आई आता नाहीये. वडील व आम्ही तिघे भाऊ बहीण !

सगळ्यांची लग्न झाली आहेत. सेपरेट बंगले असून सर्व सेटल आहेत.''

साधू : ''तुम्ही तुमच्या वडिलांशी बोलत असता का ?''

(आता मात्र त्या पत्रकाराला थोडा राग यायला लागला.)

साधू : ''तुमच्या वडिलांशी शेवटचे तुम्ही कधी बोलला ? काही आठवतंय का ?''

पत्रकाराने राग आवरत सांगितलं

: ''बहुतेक एक महिना झाला असावा.

साधू : ''तुमच्या बहीण भावाशी नेहमी भेटीगाठी करता का ?

एक कुटुंबीय म्हणून शेवटचे तुम्ही कधी एकत्र भेटले?''

(आता पत्रकाराच्या कपाळावर घाम यायला लागला, की मुलाखत कोण कुणाची घेतेय?)

तरी त्याने उत्तर दिले : ''गेल्या वर्षीच्या ख्रिसमसमध्ये भेटलो''

साधू : ''त्यावेळी किती दिवस एकत्र होता?''

पत्रकार (हळवा होत) : ''तीन दिवस होतो''


साधू : ''तुम्ही बहीण भावांनी त्या काळात किती वेळ वडिलांच्या अगदी जवळ बसून घालवला ?''

(पत्रकार आता थोडा लाजिरवाणा होऊन, मान खाली घालून कागदावर काहीतरी रेघोट्या मारत बसला.)

साधू : ''तुम्ही तुमच्या वडिलांसोबत नाश्ता, दुपारचं जेवण किंवा रात्रीचे जेवण केले का ?''

वडिलांना विचारलं का ? की कसे आहात?

आईच्या निधनानंतर ते एकटे जगत होते तर वेळ कसा घालवला?''



(असं म्हणत त्या साधूने पत्रकाराला आपुलकीने जवळ घेतलं).

साधू : ''बेटा, नाराज होऊ नको, लाजिरवाणा पण होऊ नको.

तुला असं नकळत दुखावल्याबद्दल उलट मी माफी मागतो. पण तुझ्या मूळ प्रश्नाचे उत्तर यात होते.

उेपींरलीं आणि Connection !!*cp

तू तुझ्या वडिलांच्या फक्त उेपींरलीं मध्ये आहेस. मात्र तुझं त्यांच्याशी कोणतेही Connection नाहीय.

You are not connected to him.

आणि वडील संपर्कात असणं वेगळं अन त्यांच्याशी ''लगावं'' असणं वेगळं.

कारण Connection हे नेहमी आत्म्याचे आत्म्याशी होत असते.

एकत्र बसणे, भोजन सहवास, एकमेकांची काळजी घेणं, डोळ्यांनी संपर्कात नव्हे तर डोळ्याची भाषा ओळखून त्यानुसार प्रतिसाद देणे,

आपुलकीचा स्पर्श, हात हातात घेणं.... हे सगळं उेपपशलींळेप मध्ये येत. उेपींरलीं मध्ये नाही*

तुम्ही तुमची भावंडं, वडील यांच्या उेपींरलीं मध्ये आहात पण कोणतेच Connection आपसात नाही.

आता पत्रकाराच्या डोळ्यात पाणी आलं.

एक चांगला धडा गिरवून दिल्याबद्दल आभार मानून, पत्रकार त्यांना नमस्कार करून निघाला.

आज आपल्या भोवताली बहुतेक असंच दिसतयं.. आपण आपले सख्खे नातेवाईक,आपले मित्र,आपले शेजारी,सहकारी,समाज..सर्व फक्त contact मधे ठेवतो आणी गरज पडली की लगेच connection जोडतो..*.

सर्व एकमेकांच्या उेपींरलीं मध्ये आहेत पण कुणाशी Connection (लगाव असा) काही नाही..कसला संवाद नाही. कसल्या चर्चा नाहीत. सगळे स्वमग्न झालेत..!

आपण वरचेवर बदलत चाललोय..हेच खरं आहे..!

इतक्या वर्षाचे आपले संस्कार, आईवडील गुरुजींनी शिकवलेले ते सगळं विसरलं जातंय....

कुणाला जवळ करायचं,कधी जवळ करायचं,हे चांगलच समजायला लागलयं.. प्राधान्य कशाला द्यायचं हा भावनिक व्यवहार आपण चांगलाच अंगीकारला आहे..गरज पडेल तेव्हा बघू ही वृत्ती आपण चांगलीच जोपासली आहे..वाटलं तर प्रतिसाद द्यायचा नाहीतर मोबाईल सायलेंटवर होता म्हणून सोयीचं व ठेवणीतलं ऊत्तर तयार ठेवायचं..!*

दाहक असलं ..तरी सत्य हेच आहे..

संपर्क, संवाद वाढवणं,एकमेकांना समजून घेणं,जाणून घेणं म्हणजेच connection..


वरील घटनेतील ''साधू'' म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून आपले

स्वामी विवेकानंद होते.

# सर, भारत तुमचा कायमचा ऋणी आहे!

DD पोधिगई चॅनलवर निवृत्त IAS अधिकारी श्री झ च् नायर यांची मुलाखत प्रसारित झाली. ते डॉ. अब्दुल कलाम सर राष्ट्रपती असताना त्यांचे सचिव होते.

भावनांनी भरलेल्या आवाजात त्यांनी जे सांगितले त्याचा मी सारांश केला आहे. श्री नायर यांनी ''कलाम इफेक्ट''नावाचे पुस्तक लिहिले आहे.



डॉ. कलाम जेव्हा जेव्हा परदेशात जायचे तेव्हा त्यांना महागड्या भेटवस्तू मिळायच्या. अनेक राष्ट्रे भेट देणाऱ्या राष्ट्रप्रमुखाला भेटवस्तू देण्याची प्रथा पाळतात. भेट नाकारणे म्हणजे त्या राष्ट्राचा अपमान आणि भारताची नामुष्की. म्हणून ते त्या स्वीकारायचे, परत आल्यावर भेटवस्तूंचे फोटो काढून, यादी करून रेकॉर्डला सुपूर्द करायला सांगायचे. नंतर त्यांनी त्या कधीच पाहिल्या नाहीत. राष्ट्रपती भवनातून बाहेर पडताना भेटवस्तूतील एक पेन्सिलही त्यांनी घेतली नव्हती.

२००२ मध्ये डॉ. कलाम यांनी पदभार स्वीकारला त्या वर्षी रमजान महिना जुलै-ऑगस्टमध्ये आला होता. राष्ट्रपती इफ्तार पार्टी आयोजित करतात ही सामान्य प्रथा आहे. डॉ. कलाम यांनी श्री नायर यांना विचारले, ''जेवण केलेल्या लोकांसाठी मी पार्टी का द्यावी? त्यासाठी किती खर्च येईल ते कळवा''. श्री नायर यांनी सुमारे २२ लाख खर्च येईल असे सांगितले. डॉ. कलाम यांनी ते पैसे निवडक अनाथाश्रमांना अन्न, कपडे आणि पांघरुणांच्या स्वरूपात दान करायला सांगितले. अनाथाश्रमांची निवड राष्ट्रपती भवनाच्या टीमवर सोपवली आणि त्यात डॉ. कलाम यांचा सहभाग नव्हता. निवड झाल्यावर डॉ. कलाम यांनी श्री नायर यांना त्यांच्या खोलीत बोलावून १ लाखाचा चेक दिला. ''हे माझ्या वैयक्तिक बचतीतून देत आहे. कोणालाही सांगू नका'' असे म्हणाले. श्री नायर धक्का बसून म्हणाले ''सर, मी बाहेर जाऊन सगळ्यांना सांगेन. लोकांनी कळले पाहिजे - इथे खर्च करायचा पैसा दान करणारा आणि स्वतःचा पैसाही देणारा माणूस आहे''. कट्टर मुस्लिम असूनही डॉ. कलाम यांनी अध्यक्ष असलेल्या वर्षांमध्ये इफ्तार पार्ट्या घेतल्या नाहीत.

डॉ. कलाम यांना ''होय सर'' म्हणणारे लोक आवडत नव्हते. एकदा भारताचे सरन्यायाधीश आले असता एका विषयावर डॉ. कलाम यांनी आपले मत सांगून श्री नायर यांना ''तुम्ही सहमत आहात का?'' असे विचारले. श्री नायर म्हणाले ''नाही सर, मी सहमत नाही''. सरन्यायाधीश थक्क झाले. राष्ट्रपतींशी असहमत होणे, तेही एवढ्या उघडपणे, एका नागरी सेवकाला अशक्य. श्री नायर म्हणाले ''अध्यक्ष नंतर मी का सहमत नव्हतो ते विचारतील. कारण तर्कसंगत असेल तर ९९% ते त्यांचे मत बदलतात''.

डॉ. कलाम यांनी त्यांच्या ५० नातेवाईकांना दिल्लीला आमंत्रित केले. ते सगळे राष्ट्रपती भवनात राहिले. त्यांच्यासाठी त्यांनी स्वतःच्या पैशातून बसची व्यवस्था केली. कोणतीही सरकारी गाडी वापरली नाही. त्यांचा राहण्याचा आणि जेवणाचा हिशोब डॉ. कलाम यांच्या सूचनेनुसार केला गेला. बिल २ लाख आले, ते त्यांनी भरले. देशाच्या इतिहासात असे कोणीच केले नाही.

आता क्लायमॅक्स ऐका: डॉ. कलाम यांचे मोठे बंधू एक आठवडा त्यांच्या खोलीतच त्यांच्यासोबत राहिले. डॉ. कलाम यांना त्यांचे बंधू सोबत असावेत असे वाटत होते. ते जाताना त्या खोलीचे भाडेही डॉ. कलाम भरू इच्छित होते. एका देशाच्या राष्ट्रपतीला आपण राहत असलेल्या खोलीचे भाडे द्यावेसे वाटणे याची कल्पना करा. हे खूप झाले असे वाटून कर्मचाऱ्यांनी याला मान्यता दिली नाही!!!

कलाम सर कार्यकाळाच्या शेवटी राष्ट्रपती भवन सोडताना, सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन आदर व्यक्त केला. श्री नायर यांच्या पत्नीला पायाला फ्रॅक्चर झाल्याने त्या अंथरुणात होत्या म्हणून ते एकटेच गेले. डॉ. कलाम यांनी ''तुमच्या पत्नी का आल्या नाहीत?'' असे विचारले. अपघातामुळे अंथरुणात आहेत असे सांगितले. दुसऱ्या दिवशी श्री नायर यांनी त्यांच्या घराभोवती खूप पोलीस पाहून काय झाले असे विचारले. ''भारताचे राष्ट्रपती तुम्हाला भेटायला येत आहेत'' असे सांगितले. ते आले आणि त्यांच्या पत्नीला भेटून थोडा वेळ बोलले. कोणत्याही देशाचा अध्यक्ष अशा छोट्या कारणासाठी एका नागरी सेवकाच्या घरी भेट देत नाही असे श्री नायर सांगतात.

तुमच्यापैकी अनेकांनी ही मुलाखत पाहिली नसेल म्हणून तपशील दिला आहे.

APJ अब्दुल कलाम यांचे धाकटे बंधू छत्री दुरुस्तीचे दुकान चालवतात. कलाम यांच्या अंत्यसंस्कारावेळी श्री नायर यांना भेटल्यावर, त्यांनी श्री नायर आणि बंधू दोघांनाही आदर म्हणून त्यांच्या पायांना स्पर्श केला.

मुख्य प्रवाहातील माध्यमे हे दाखवत नाहीत कारण याला TRP नाही. म्हणून ही माहिती सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केली पाहिजे.

डॉ. अझग अब्दुल कलाम यांनी मागे ठेवलेल्या मालमत्तेचा अंदाज:

- ६ पँट (2 DRDO गणवेश)
- ४ शर्ट (2 DRDO गणवेश)
- ३ सूट (१ पाश्चिमात्य, २ भारतीय)
- २५०० पुस्तके
- १ फ्लॅट (तो त्यांनी दान केला आहे)
- १ पद्मश्री
- १ पद्मभूषण
- १ भारतरत्न
- १६ डॉक्टरेट पदव्या
- १ वेबसाइट
- १ ट्विटर खाते
- १ ईमेल DD

त्यांच्याकडे TV, AC, गाडी, दागिने, शेअर्स, जमीन किंवा बँक बॅलन्स नव्हता. गेल्या ८ वर्षांची पेन्शनही त्यांनी त्यांच्या गावाच्या विकासासाठी दान केली होती. ते खरे देशभक्त आणि खरे भारतीय होते. सर, भारत तुमचा कायमचा ऋणी आहे....!

**– प्रकाश वाखरे**



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल

# विचार कल्पतरू

मनुष्याला आपल्या अंतर्जागृत बुद्धीवर ताबा मिळविणे फारच कठीण असते, कारण तिथे विचारांनी एकदा ठाणे मांडले की त्यांना तेथून काढणे फार मुश्किलीचे असते. पण आंतर्जागृत बुद्धीत कोणते विचार जाऊ द्यावयाचे आणि कोणते जाऊ द्यायचे नाही ही गोष्ट मात्र जागृत बुद्धीच्या स्वाधीन असते. जागृत बुद्धी ही जणू काही पहारेकऱ्याचे काम करते असे म्हटले तरी वावगे होणार नाही .तिच्या संमतीशिवाय कोणताही विचार अंतर्जागृत बुद्धित शिरू शकत नाही. विचारांचा असा गुण आहे की साधे म्हणजे तीव्र भावनायुक्त नसलेले विचार अंतर्जागृत बुद्धी त जाऊन बसू शकत नाही .भावनांनी उद्दीपित झालेली विचार आंतर्जागृत बुध्दीत सहज शिरतात आणि जितकी भावना तीव्र असेल त्या मनाने ते खोल जाऊन बसतात. दररोज आपण जागृती अवस्थेत शेकडो विचार करतो पण त्यापैकी क्वचितच एखाद्या आंतर्जागृत बुद्धी त शिरतो.पण दुःख, अपमान, अपयश ,भीती, द्वेष ,मत्सर, सूड ,काळजी इत्यादी भावना जेव्हा तीव्र स्वरूपाच्या असतात तेव्हा त्यांच्या संबंधीचे विचार मात्र बऱ्याच प्रमाणात आंतर्जागृत बुद्धीत शिरतात आणि तेथे दबा धरून बसतात .केवळ अनिष्ट भावनायुक्त विचारच अंतर्गत जागृत बुद्धी शिरतात असे मात्र नाही .त्या दृष्टीने अंतर्जागृत बुद्धी ही सर्वांना समान समजणारी आणि निपक्षपाती असते तिला ईष्ट अर्निष्ट भावनायुक्त विचारांचा विधी निषेध नसतो. विचार फक्त तीव्र भावनायुक्त असला म्हणजे झाले. अनिष्ट आणि दुष्ट विचार जागृत बुद्धीत आपोआप येतातआणि तेथून आंतर्जागृत बुद्धी त सहज जातात .पण सद्भावना विचार मात्र जागृत बुद्धीत मुद्दाम आणावे लागतात .तेव्हाच ते अंतर्जागृत बुद्धीत जाऊ शकतात .जागृत बुद्धीवर सतत ताबा न ठेवल्यास दुःख, निराशा, काळजी, भीती राग व्देष मत्सर सूड इत्यादी अनिष्ट भावना युक्त विचार जागृत बुद्धीत येऊन अंतर्जागृत बुद्धीत आपोआप जातात. पण उत्साह, आशा, प्रेम ,दया, क्षमा ,भक्ती भाव, सुख, धैर्य इत्यादी सद्भावना युक्त विचार जागृत बुद्धीमध्ये मुद्दाम आणावे लागतात .तेव्हा ते तिथून अंतर्जागृत बुद्धी त शिरू शकतात.



ज्याप्रमाणे परस्पर विरुद्ध भावना मनात एकाच वेळी राहू शकत नाही त्याप्रमाणे अंतर्जागृत बुद्धीतही ईष्ट आणि अनिष्ट भावनायुक्त विचार एकाच वेळी राहू शकत नाही, म्हणून अंतर्जागृत बुद्धीत अनिष्ट भावना युक्त विचारांचा शिरकाव झाला असेल तर ते काढण्याकरिता इष्ट भावना युक्त विचार जागृती अवस्थेत सदैव बुद्धीत बाळगणे हा एकच उपाय असतो . इष्ट भावना युक्त विचार जागृत बुद्धीच्या द्वारे अंतर्जागृत बुद्धीत शिरले म्हणजे अनिष्ट भावना युक्त विचार तेथून हळूहळू निघून जातात आणि कालांतराने अंतर्जागृत बुद्धी त पूर्णपणे इष्ट भावनायुक्त विचारच राहतात. अंतर्जागृत बुद्धीवर प्रत्यक्षपणे आपला अधिकार चालत नसला तरी याप्रमाणे अप्रत्यक्षपणे चालू शकतो. विचार कल्पतरू_आपण सुखी किंवा दुःखी, यशस्वी वा अयशस्वी होणे आपल्या स्वतःच्या मनावर आहे. जसे होण्याची आपली इच्छा असेल तशा प्रकारचे दृढ श्रद्धायुक्त विचार आपण जागृता अवस्थेत बुद्धीत ठेवीत गेल्यास कालांतराने आपल्या विचारांना मूर्त स्वरूप येते असा अनुभव येतो .आपणास सुखी आणि यशस्वी होण्याची इच्छा असल्यास सुखाचे व यशाचे विचार जागृत अवस्थेत बुद्धीत ठेवीत गेले पाहिजे .अपयशाचे आणि दुःखाचे विचार करीत राहणारी मनुष्ये अपयशी आणि दुःखी झाल्या शिवाय राहत नाही. मनुष्य जे विचार जागृत अवस्थेत बुद्धीत ठेवून तदनुसार प्रयत्न करीत राहतो त्या विचारांना मृत स्वरूप प्राप्त होण्याची प्रबळ प्रवृत्ती नेहमी दिसून येते जसे मनुष्याचे विचार असतात त्यानुसार तिच्या भावना बनतात आणि भावनांनुसार कृती बनते मनुष्य निर्भयपणे एखाद्या उंच शिडीवर चढू लागला तर तो वाटेल तितका उंच चढू शकतो पण आपण पडू कि काय असा विचार त्याच्या बुद्धीत आल्याबरोबर त्याचे पाय लटपटू लागतात व त्याचा झोक जाऊन तो पडण्याचा ही संभव असतो. म्हणून मनुष्याने सर्व परिस्थितीमध्ये आपल्या जागृत बुद्धी तउच्च प्रकारचे आणि इष्ट भावनायुक्त विचार च ठेवीत गेले पाहिजे कोणत्याही प्रकारच्या कु विचारांना कधीही थारा देता कामा नये म्हणजे त्याच्या भावना उत्तरोत्तर शुद्ध होऊन त्याच्या हातून उच्च कर्मे घडत जातात त्याची पारमार्थिक आणि व्यवहारिक दृष्टीने उन्नती होत जाते व तो साहजिकच सद्गुणी सदाचारी सुखी आणि यशस्वी होतो. बुद्धितील कु विचार काढून त्यांच्या जागी सुविचार स्थापन करण्याकरिता आत्म सुचनांची फार मदत होते. मनुष्य जागा असतो तोपर्यंतच जागृत बुद्धीचे व्यापार चालू असतात. पण आंतर्जागृत बुद्धी च्या व्यापारात केव्हाच खंड पडत नाही. कोणत्याही विषयासंबंधाने तीव्रपणे विचार करण्यात जागृत बुद्धी गढलेली असली म्हणजे झोपेतही तेच विचार अंतर्जागृत बुद्धीत चालू राहतात. याचा अर्थ जागेपण केलेले विचारच झोपेत अंतर्जागृत बुद्धीत चालू राहतात म्हणून जागे पणी चांगले विचार करावे म्हणजे झोपेतही चांगले विचार चालू राहतील.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

# ऋतुरंग

शाळेतल्या 'ऋतुरंग' या सांस्कृतिक कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू होती. प्रत्येक वर्गात एक प्रकारची चुरस निर्माण झाली होती. कोणी गायनात बाजी मारणार होते तर कोणी लोकनृत्याचा कसून सराव करत होते. आपआपल्या सादरीकरणासाठी वादक निवडायचे काम चालू होते. श्रावणातल्या तिसऱ्या आठवड्यात 'ऋतुरंग' हा बहारदार कार्यक्रम शाळेच्या मुख्य सभागृहात सादर होणार होता.

नववीच्या वर्गाचा या कार्यक्रमावर आधीच दबदबा होता. सूत्रसंचालन करणारी श्वेता त्याच वर्गातील होती. त्यामुळे कार्यक्रमातील छोट्या-मोठ्या बदलांविषयी तिला आधीच माहिती असणार. या माहितीचा उपयोग नववीचा वर्ग करून घेणार असा अन्य वर्गांचा आक्षेप होता. पण शिक्षकांनी सर्वांना आश्वासन दिलं होतं की असल्या तांत्रिक बाबींवर कलेचे परीक्षण होत नाही. तुम्ही तुमच्या सादरीकरणावर लक्ष केंद्रित करा. मग सगळेजण वर्गातला अभ्यास सांभाळून आपल्या सरावाकडे लक्ष देऊ लागले.

नववीतल्या मुलींच्या गटाचे नेतृत्व साक्षी करत होती. ती स्वतः उत्तम नर्तन करायची. यंदा लोकनृत्याचे बक्षीस आपल्याच गटाला मिळावे असे तिला मनातून वाटत होते. सरावासाठी ती आपल्या संघातील मुलींना सोबत घेऊन शाळेच्या कॉमन रूममध्ये सकाळी तासभर लवकर यायची. शाळा सुरू झाल्यावरही शिक्षकांच्या परवानगीने सहा वाजेपर्यंत थांबायच्या. नववीच्या वर्गातील मुला-मुलींचा सराव पाहून इतर वर्गांनाही जोश आला होता. आठवीच्या वर्गाने तर आधी निवडलेले लोकगीत बदलून नव्या गीतावर नृत्य बसवायची तयारी सुरू केली होती.

बाहेर वर्षाऋतूने आपली करामत दाखवायला सुरुवात केली होती. उंच, काळ्याशार डोंगरावरून वाहणारे पांढरेशुभ्र धबधबे, जमिनीला स्पर्श करू म्हणणारे ढगांचे पुंजके, त्यांच्या स्वागतासाठी स्वतः हिरवा शालू नेसून तयार असलेली धरणी आणि तिच्या या हिरव्या शालूला आणखी शोभा आणणारी रंगीबेरंगी, उडती, चिमुकली फुलपाखरे सर्वांच्या मनात आनंद पसरवित होती. हवेतला गारवा मनातल्या उमेदीला आव्हान देत होता. मुला-मुलींचा उत्साह ओसंडून वाहत होता.

आताची पोरं काहीच करत नाहीत. असं म्हणणाऱ्यांना जबरदस्त चपराक बसावी, असं वातावरण शाळेच्या प्रांगणात तयार झालं होतं.

अगं! आपण गाण्याच्या दुसऱ्या कडव्याला साधी स्टेप नाही करायची. थोडा स्टंट करू. नृत्यात थोडं थ्रिल आलं तर अधिक बहार येईल. श्वेता आपल्या मैत्रिणींना सांगत होती.

तेवढ्यात एका मोटरसायकलवर दहावीतला अमित आणि आठवीतील सीमा जाताना त्यांना दिसली.

अगं श्वेता, या सीमाला समजावून सांगायला पाहिजे. नाहीतर घात होईल. प्रणिता एका हातातले घुंगरू दुसऱ्या हातात घेत म्हणाली.

का? काय झालं? श्वेताने विचारले.

अगं, आम्ही चार-पाच दिवस पाहतोय ती त्या अमितसोबत गाडीवर जातेय. शाळेच्या गेटबाहेर उतरते नि हळूच वर्गात येते. प्रणिताने सांगितले.


तुला माहितीये ना तो पोरगा कसा आहे ते! तिला एकदा बोलायला हवं. मानसीने दुजोरा दिला.

अगं, जाऊ दे, त्यांच्या या बावळटपणामुळे त्यांचेच सादरीकरण फसेल. त्यात आपला फायदा होईल! मोहिनी म्हणाली.

तसा विचार नको करायला! ती नव्यानेच या शाळेत आलेय. तिला या विचित्र अमितविषयी माहिती नसेल. स्पर्धा काय, एक दिवसाची आहे. तिचे आयुष्य बर्बाद नको व्हायला. साक्षी दमदार पावले टाकत बोलली.

शाळा जवळ येताच विषय आपोआप थांबला. साक्षीच्या टीमने नव्या स्टेप आणि स्टंट्सचा सराव केला. मग नेहमीच्या तासांना त्या हजर राहिल्या. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत साक्षीने भरभर जेवण उरकले.

मी दीक्षित सरांना भेटून आले गं! असं सांगून ती थेट तिसऱ्या मजल्यावरील आठवीच्या वर्गात पोहचली. वर्गात सीमा एका खिडकीशेजारी उभी राहून खाली मैदानावरील मुलांना न्याहाळत होती. साक्षीची चाहूल लागताच ती बेंचकडे सरकली.



काय गं सीमा, जेवलीस का? साक्षीने सहज विचारले.हो जेवले. सीमाने त्रोटक उत्तर दिले.

एकटी-एकटी कशाला राहतेस? मैत्रिणींसोबत खाली जायचे ना! असं म्हणत-म्हणत साक्षी खिडकीपाशी गेली. तिने खिडकीतून खाली पाहिले. तिच्या अंदाजाप्रमाणे अमित मैदानावर उभा असलेला तिला दिसला.

सीमा, एक बोलू? तुला राग तर नाही ना येणार? साक्षीने थेट विषयालाच हात घालण्याचे ठरवले. ऋतुरंगविषयी का? बोल ना! सीमा स्वतःला वाचवत म्हणाली.

ऐक, तू या शाळेत नव्याने आली आहेस. इथली दोन-तीन मुले वात्रट आहेत. अशा मुलांपासून तू सावध रहा. त्यांच्या भुलथापांना अजिबात बळी पडायचे नाही.

तसं काही नाही. मला शाळेत यायला उशीर झाला होता, म्हणून मी त्याच्या गाडीवर एकदा आले होते. सीमाने वस्तुस्थिती स्वीकारली होती.

मी कोणा एकाबद्दल किंवा विशिष्ट मुलाबद्दल बोलत नाही. फक्त तू सावधगिरीने वाग.

अगं, तो माझ्या निघण्याच्या वेळेसच गाडी घेऊन रस्त्यात भेटतो. गाडीवर बसण्यासाठी खूप आग्रह करतो. खरं सांगू, आज तो म्हणाला की माझं तुझ्यावर प्रेम आहे. तेव्हापासून मी खूप डिस्टर्ब आहे. सीमाने कबूल केले.

अगं! म्हणून म्हणते की एकटीने राहू नकोस.

पण आज मला वेगळंच वाटू लागलंय

अगं या वयात असंच वाटतं. आपल्याला कोणी छान, सुंदर बोललं की अंगावर मोरपिस फिरवल्यासारखं वाटतं. माझी मम्मी मला नेहमी सांगते की माणसाची नजर ओळखायला आपण शिकलो पाहिजेत. माणसाचे डोळे सहसा खोटे वागत नाहीत.

म्हणजे नेमकं काय करावं हेच सूचत नाही.

सगळ्यात आधी तू तुझ्या मनातली भीती काढून टाक. तो पुन्हा रस्त्यात भेटला तर त्याला स्पष्टपणे 'नाही' म्हण. उद्यापासून तू आमच्यासोबत ये. अगं! गेल्यावर्षी त्याने अशाच एका मुलीची छेड काढली होती. ती बिचारी शाळा बदलून दुसऱ्या गावी राहण्यास गेली.

मला त्याची भीती वाटते.

भीती वाटते की त्याच्याविषयी प्रेम वाटते?

दोन्ही.

साफ खोटं. त्याची भीती वाटत असेल तर प्रेम अजिबात मानू नकोस. प्रेम करायला अजून पुढचं भरपूर आयुष्य पडलंय. अभ्यासात लक्ष दे. आजच तुझ्या आईला हे सारं खरं खरं सांग. माझी मम्मीही तुझ्या मदतीला येईल. आम्ही सगळ्याजणी तुझ्यासोबत आहोत.''

तू म्हणतेस ते पटतंय मला. पण माझी मम्मी मलाच बोलेल. ती रागवेल.

ती बोलली, ती रागावली तरी हरकत नाही. मात्र होणाऱ्या दुष्परिणामांपासून तुझं रक्षण होईल.

मी प्रयत्न करते. पण तू कोणाला बोलू नको. मी बोलणार नाही. पण सल्ला मानणे तुझ्या हातात आहे. तू निर्णय घेण्यास जितका उशीर लावशील तितका तो गैरफायदा घेत राहील.

तेवढ्यात दरवाजात मुलींचा घोळका येताना दिसला. साक्षीने सीमाच्या पाठीवर हात ठेवत म्हटले, उद्या आमच्या घरी निघून ये. आपण सोबतच शाळेत येऊ. जाते मी.

थँक यू! तुझ्यामुळे माझ्या मनातला गोंधळ दूर झाला.

दोघी घाई-घाईने बाकड्यावरून उठल्या नि कॉरिडोअरमध्ये आल्या. जाता-जाता साक्षी पुन्हा म्हणाली,

स्वतःला एकटी समजू नकोस. आम्ही तुझ्यासोबत आहोत. मात्र तू चुकीचं वागलीस तर त्याची संपूर्ण जबाबदारी तुझीच असेल.

तुझं म्हणणं पटलंय मला. मी उद्या किती वाजता येऊ?

सीमाच्या प्रश्नाने साक्षीच्या मनाला खात्री पटली नि ती म्हणाली,

साडे नऊ वाजता ये.

तेवढ्यात मधली सुट्टी संपल्याची घंटा झाली.

# 'एक कप चहा.. पंधरा कोटींची माणुसकी'

पहाटेचे साडेपाच वाजले होते.

मुंबईच्या गोरेगाव स्टेशनबाहेर नेहमीप्रमाणे गडबड सुरू झाली होती. रिमझिम पावसात लोकल ट्रेनमधून उतरणाऱ्या चाकरमान्यांची गर्दी एकाच दिशेने धावत होती. स्टेशनसमोरील एका छोट्या चहाच्या टपरीवर चहाची उकळी फुटली होती आणि त्याचा सुगंध हवेत पसरला होता. २४ वर्षांची अनन्या डोळ्यांवर झापड असलेल्या अवस्थेत भराभर चहाचे कप विसळत होती. तिचे वडील, सदाशिव, गॅसच्या शेगडीसमोर उभे राहून चहा उकळत होते. तेवढ्यात अनन्याच्या मोबाईलची स्क्रीन उजळली. एक व्हॉट्सॲप मेसेज आला होता. बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत नंबरवरून तो मेसेज होताप्रिय ग्राहक, तुमच्या खात्यात १५,००,००,००० (पंधरा कोटी रुपये) जमा करण्यात आले आहेत. खाते सुरक्षिततेसाठी बँकेच्या मुख्य शाखेत त्वरित संपर्क साधावा.

अनन्याच्या हातातून काचेचा कप निसटला आणि थेट खाली पडला. काचेचे तुकडे होताच ती दचकली. तिने डोळे चोळून पुन्हा तो आकडा मोजला. एका साध्या, गरिबीशी लढा देणाऱ्या चहावाल्याच्या मुलीच्या खात्यात अचानक पंधरा कोटी रुपये कुठून येणार? हा एखादा फ्रॉड मेसेज असावा की बँकेची चूक? की यामागे काहीतरी भयंकर रहस्य होते? तिच्या छातीत धडधडू लागले. तिची नजर नकळत रस्त्याच्या पलीकडे, सिग्नलच्या खांबाखाली गेली. तिथे गेली सहा महिने बसणारा तो म्हातारा भिकारी आज तिथे नव्हता. ती जागा पूर्णपणे रिकामी होती, फक्त तिथे एक जुनी लाकडी काठी पडलेली होती. अनन्याच्या मनात एकदम शंकेची पाल चुकचुकली.

सहा महिन्यांपूर्वी अनन्याचे आयुष्य अतिशय कठीण परिस्थितीतून जात होते. तिने बी.कॉम. पूर्ण केले होते, पण अनेक मुलाखती देऊनही तिला कुठेही नोकरी मिळत नव्हती. तिचे वडील सदाशिव गेल्या वीस वर्षांपासून गोरेगाव स्टेशनबाहेर ही छोटी चहाची टपरी चालवत होते. पण गेल्या वर्षी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला, ज्यामध्ये त्यांच्या उपचारासाठी घरातले सगळे सोने आणि साठवलेले पैसे संपले होते. डॉक्टरांनी त्यांना जास्त कष्ट न करण्याचा सल्ला दिला होता, म्हणूनच अनन्याने स्वतः टपरीवर बसण्याचा निर्णय घेतला. पदवीधर मुलगी रस्त्यावर चहा विकते म्हणून सुरुवातीला



लोकांनी खूप नावे ठेवली, पण आपल्या आजारी वडिलांसाठी आणि घरासाठी ती खंबीरपणे उभी राहिली.

त्याच काळात, ऑक्टोबरच्या एका कडकडत्या थंडीच्या सकाळी, अनन्या टपरीवर चहा बनवत होती. शेजारी असलेल्या ट्रॅफिक सिग्नलच्या खांबाला टेकून एक म्हातारा भिकारी बसला होता. अंगावर फाटकी गोणपाटाची गोण, विस्कटलेले पांढरे केस, चेहऱ्यावर वाढलेली पांढरी दाढी आणि पायात तुटलेली चप्पल. तो थंडीने कुडकुडत होता आणि येणाऱ्या-जाणाऱ्यांकडे आशेने पाहत होता. लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करून, कधीकधी त्याला झिडकारून पुढे जात होते.

अनन्याने ते पाहिले. तिच्या मनात कणव निर्माण झाली. तिने एका कागदाच्या कपमध्ये वाफाळलेला आद्रकचा चहा घेतला आणि दोन बिस्किटे घेऊन ती रस्त ओलांडून त्याच्यापाशी गेली.

''बाबा, हे घ्या. चहा प्या, थंडी कमी होईल,'' तिने तो कप त्याच्या समोर धरला.

त्या म्हाताऱ्याने डोके वर केले. त्याच्या डोळ्यात एक अजब शांतता होती, जी सामान्य भिकाऱ्यांच्या डोळ्यात नसते. त्याचे डोळे खूप तीक्ष्ण होते. त्याने चहाचा कप हातात घेतला. त्याचे हात थरथरत नव्हते. त्याने एक घोट घेतला आणि अनन्याकडे पाहून एक मंद हसू दिले. तो काहीच बोलला नाही, पण त्याच्या नजरेत एक कृतज्ञता होती.

त्या दिवसापासून एक नवीन नियमच बनला. अनन्या रोज सकाळी साडेपाच वाजता टपरी उघडायची आणि पहिला चहा त्या म्हाताऱ्यासाठी काढून ठेवायची. पाऊस असो वा थंडी, ती स्वतः रस्ता ओलांडून त्याला चहा आणि नाश्ता द्यायची. कधी पोहे, तर कधी उपमा. हळूहळू त्यांच्यात एक न बोलता येणारे नाते तयार झाले होते. अनन्या त्याला 'बाबा' म्हणायची. तो कधीही पैसे मागायचा नाही, की कोणाशी हुज्जत घालायचा नाही. तो फक्त तिथे शांतपणे बसायचा, येणाऱ्या-जाणाऱ्या जगाकडे पाहायचा आणि अनन्याच्या चहाची वाट पाहायचा.

एकदा दुपारी खूप मोठा पाऊस आला. स्टेशनच्या बाहेर पाणी साचले होते. तो म्हातारा पावसात पूर्ण भिजत होता. अनन्याने आपल्या टपरीतली मोठी छत्री काढली आणि धावत जाऊन त्याच्या डोक्यावर धरली. ''बाबा, इथे या ओट्या खाली बसा, ओले व्हाल तर आजारी पडाल,'' तिने त्याला आडोशाला आणले. तेव्हा त्या म्हाताऱ्याने पहिल्यांदा तिचा हात हातात घेतला आणि तिच्या डोक्यावरून हात फिरवला. त्याच्या त्या स्पर्शात वडिलांसारखी माया होती. तो म्हणाला होता, ''बाळा, खूप मोठी होशील तू. तुझं मन खूप श्रीमंत आहे.'' त्याचा आवाज अतिशय भारदस्त आणि सुशिक्षित माणसासारखा होता, जो अनन्याला काही काळ चक्रावून गेला. पण तिने फारसा विचार केला नाही.

गेल्या काही दिवसांपासून सदाशिव यांची तब्येत पुन्हा बिघडू लागली होती. डॉक्टरांनी सांगितले होते की त्यांच्या हृदयाची एक बायपास शस्त्रक्रिया तातडीने करावी लागेल, ज्यासाठी किमान पाच लाख रुपयांची गरज होती. अनन्या पूर्णपणे खचून गेली होती. ती रात्री-रात्री रडायची. तिने अनेक नातेवाईकांकडे हात पसरले, बँकेत कर्जासाठी चकरा मारल्या, पण एका चहावाल्याच्या मुलीला पाच लाख रुपये कर्ज द्यायला कोणीही तयार नव्हते.

काल रात्री तर सदाशिव यांना दवाखान्यात दाखल करावे लागले होते. आयसीयूच्या बाहेर बसून अनन्या देवाचा धावा करत होती. तिच्याकडे हॉस्पिटलचे डिपॉझिट भरायलाही पैसे नव्हते. आज सकाळी ती फक्त टपरीवर काही पैसे जमा होतात का, हे पाहण्यासाठी आली होती, कारण सकाळच्या गर्दीत चहाचा गल्ला चांगला व्हायचा. आणि टपरी उघडताच तिच्या फोनवर हा पंधरा कोटींचा मेसेज आला होता.

''काय झालं ग अनन्या? काय पाहतेस फोनमध्ये?'' सदाशिव यांनी हॉस्पिटलमधून फोन करून विचारले. त्यांचा आवाज खूप क्षीण होता.

''काही नाही बाबा, मी येतेच दवाखान्यात,'' अनन्याने फोन ठेवला. तिचा विश्वास बसत नव्हता. तिने लगेच तिची बॅग उचलली, टपरी बंद केली आणि ती थेट फोर्टमधील बँक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेकडे निघाली. तिचे पाय थरथरत होते.

बँकेच्या मुख्य शाखेत पोहोचल्यावर तिथे प्रचंड गर्दी होती. अनन्याने तिथल्या एका कर्मचाऱ्याला आपला मेसेज दाखवला. तो मेसेज पाहताच त्या कर्मचाऱ्याचे डोळे मोठे झाले. त्याने अनन्याला थांबायला सांगितले आणि तो थेट बँकेच्या मॅनेजरच्या केबिनमध्ये गेला. दोन मिनिटांत तो बाहेर आला. ''मॅडम, मॅनेजर सर तुम्हाला आत बोलावत आहेत. प्लीज या.''

अनन्या केबिनमध्ये गेली. एका मोठ्या सुटाबुटातल्या अधिकाऱ्याने उभे राहून तिचे स्वागत केले. ''या, अनन्या देशपांडे ना तुम्ही? प्लीज बसा.''

''सर, मला हा मेसेज आलाय. मला वाटतं ही काहीतरी चूक आहे. माझ्या खात्यात एवढे पैसे कुठून येणार? मी एक साधी चहावाली आहे,'' अनन्याने घाबरत म्हटले.

मॅनेजरने हसून मान हलवली. ''नाही अनन्याजी, ही कोणतीही चूक नाही. हे पैसे कायदेशीररीत्या तुमच्याच खात्यात ट्रान्सफर करण्यात आले आहेत. आणि हे पैसे कोणी ट्रान्सफर केले आहेत, हे सांगण्यासाठीच आमच्या बँकेच्या मुख्य कायदेशीर सल्लागारांनी आणि एका मोठ्या वकिलांनी तुमची वाट पाहत आहोत.'' मॅनेजरने बाजूच्या कॉन्फरन्स रूमचा दरवाजा उघडला.

आत एक वृद्ध वकील आणि दोन शासकीय अधिकारी बसले होते. त्यांच्या टेबलवर काही मोठी कागदपत्रे आणि एक जुनी लाकडी काठी ठेवलेली होती. ती काठी पाहताच अनन्या थबकली. ती तीच काठी होती, जी रोज गोरेगाव स्टेशनबाहेर त्या सिग्नलच्या खांबाला टेकून ठेवलेली असायची!

''बसा अनन्या बेटी,'' त्या वृद्ध वकिलाने अत्यंत आदराने सांगितले. ''माझे नाव ॲडव्होकेट पळशीकर. मी भारताचे एक खूप मोठे उद्योगपती, स्वर्गीय रणजीतसिंग सिंघानिया यांचा मुख्य वकील आहे.''

''रणजीतसिंग सिंघानिया? पण मी त्यांना ओळखत नाही,'' अनन्या म्हणाली.

वकिलाने खिशातून एक फोटो काढला आणि टेबलवर ठेवला. **(पान ६ वर)**

# राष्ट्रीय आंदोलनात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

माझा खान्देश

राष्ट्रीय आंदोलनात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या जीवाची आहूती दिली. असंख्य वीरांच्या बलिदानाने स्वातंत्र्याचा मार्ग प्रशस्त झाला . स्वातंत्र्य सैनिकांचे बलिदान व त्यागामुळेच आज आपण स्वच्छंदपणे श्वास घेऊ शकतो व स्वातंत्र्याची फळे चाखत आहोत. त्यांचे बलिदान हे प्रातः स्मरणीय आहे.

**स्वातंत्र्य सैनिक नवल आनंदा पाटील :**

स्वातंत्र्य सैनिक नवल आनंदा पाटील यांचा जन्म ११ ऑगस्ट १९०७ रोजी धुळे जिल्ह्यातील नावरा-नावरी या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. ते 'भाऊ' या टोपन नावाने ओळखले जात. लहानपणापासुन कुशाग्र बुद्धी असलेल्या नवलभाऊंनी प्राथमिक शिक्षण धुळे तालुक्यातील न्याहळोद व धुळे येथील नगर पालीकेच्या शाळेत व धुळ्यातील सोद्धारक विद्यार्थी वसतीगृहात राहुल पूर्ण केले. याच वसतिगृहात राहत असतांना त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. पुढे दोंडाईचा येथील स्वोध्दारक शाळेत त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. याच ठिकाणी त्यांच्या जीवनात स्वातंत्र्य चळवळीविषयी आस्था निर्माण होऊन स्वातंत्र्य सैनिक रंगनाथ टोणगावकर यांच्या विचारांनी प्रभावित होऊन महात्मा गांधीजींच्या कायदेभंग व दांडी यात्रा आंदोलनात नवल आनंदा पाटील सामील झाले. नवलभाऊंचा दांडी यात्रेतील सहभाग ही त्यांची स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाची सुरुवात होती. दांडी यात्रेच्या निमित्ताने नवलभाऊंना गांधीजींचे दर्शन झाले. दांडी यात्रेहुन परत आल्यावर नवलभाऊंनी जिल्हाभर दौरे काढून शेकडो स्वयंसेवक सत्याग्रहासाठी तयार केले. पश्चिम खानदेशात होत असलेली स्वातंत्र्य विषयक जागृती ब्रिटीश सरकारला घातक वाटु लागली होती. अशावेळी भाऊ मात्र साऱ्या पश्चिम खानदेशात राजकीय जागृती करीत होते. नवलभाऊंनी धुळे येथे पांझरा नदीच्या काठावर झालेल्या सभेत स्वातंत्र्याच्या ठरावाला विद्यार्थ्यांच्या वतीने पाठींबा दिला. म्हणून ब्रिटीश सरकारने नवलभाऊंवर १९३० साली खटला भरुन त्यांना ९ महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा सुनावली.

१९३१ साली कराची येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात पश्चिम खानदेशचे प्रतिनिधी म्हणून नवलभाऊंनी सहभाग तसेच १९३६ साली खानदेशातील फैजपूर येथे भरलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सहभाग घेतला. भारतात १९४२ च्या अत्यंत धामधुमीच्या काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीने उग्र स्वरुप धारण केले होते. देशभर क्रांतीच्या घोषणा आणि गर्जना ऐकू येत होत्या. 'भारत छोडो' चार नारा सर्वत्र दुमदुमू लागला. महात्मा गांधीजींची अटक, त्यांची,'करेंगे या मरेंगे' घोषणा यामुळे भारतीय जनता पेटून उठली होती. खानदेशातही वेगळे चित्र नव्हते,. या संदेशाची माहिती नवलभाऊंना होती. महात्मा गांधींनी पुकारलेल्या आंदोलनात नवलभाऊ खानदेश भागात पूर्ण ताकदीने उतरले. ब्रिटिश सरकारचे दळणवळण रोखण्यासाठी टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वे मार्ग विस्कळीत करणे अशा धाडसी मोहिमा त्यांनी सहकाऱ्यांसह राबवल्या. सातारा जिल्ह्यात सुरू झालेल्या प्रति सरकार चळवळीचा प्रभाव खानदेशात पसरवण्यात नवल भाऊंचा मोठा वाटा होता ब्रिटिशांचा कर न भरणे आणि गावोगावी समांतर लोक न्यायालय चालवणे यात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. ब्रिटिश पोलिसांनी त्यांच्यावर वॉरंट जारी केले होते मात्र सातपुड्याच्या पर्वतरांगा आणि तापी नदीच्या खोऱ्यातील भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत त्यांनी दीर्घकाळ भूमिकेत राहून चळवळ जिवंत ठेवली क्रांतिकारकांना सुरक्षित आश्रय, शस्त्रे आणि रसद पुरवण्याचे काम त्यांनी केले. ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी प्रयत्न केले. अनेक दिवस त्यांनी ब्रिटिशांना हुलकावणी दिली. भूमीगत होण्यापूर्वीचे ९ ऑगस्ट १९४२ च्या पहाटे ४ वाजता नवलभाऊंना त्यांच्या नावरी या गावी ब्रिटीशांनी अटक केली. त्यांना स्थानबद्ध करून पावणे दोन वर्षे नाशिक येथील कारागृहात कैदेत ठेवण्यात आले.१९३० मध्ये नवलभाऊ मॅट्रीकच्या वर्गात होते. स्वातंत्र्य संग्रामात भाग घेण्यापूर्वी भाऊंनी मॅट्रीकची परीक्षा पास करावी आणि नंतर त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घ्यावा असे त्यांच्या शिक्षकांनी समजावून सांगितले. पण 'मला नोकरीच करावयाची नाही, मी शेतकऱ्याचा मुलगा आहे, तेव्हा शेतीत राबून मी माझा उदरनिर्वाह सहज करु शकेन' असे बाणेदार उत्तर भाऊंनी त्यांच्या शिक्षकांना दिले होते.नवलभाऊंचे त्यागमय जीवन हे गांधीजी, विनोबाजी व सानेगुरुजी यांच्या विचारांशी एकरुप झाले होते. नवलभाऊंनी त्यांचे समकालीन नानासाहेब ठकार, हिरालालजी सार्वे, शंकरराव परांजपे, यशवंतराव जिभाऊ देसले, अण्णासाहेब रंगनाथ टोणगावकर, हरिभाऊ उपासनी यांच्याबरोबर खादीच्या प्रचाराचे व ग्रामद्योगाचे कार्य केले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही गुजरात आणि महाराष्ट्र ही दोन्ही राज्ये एकत्र होती. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरु असतांना इ.स. १९५२ मध्ये मोरारजी भाई देसाई मुख्यमंत्री असतांना व आचार्य अत्रे सारखे दिग्गज नेते असतांनाही पक्षाचा व्हिप मोडून विधान भवनात द्विभाषिक मुंबई राज्याला विरोध करणारे भाषण नवलभाऊंनी केले आणि ठणकावून सांगितले की, 'महाराष्ट्रातून मुंबई वेगळी करता येणार नाही जर असे झाले, तर मी माझ्या आमदार पदाचा राजीनामा देईन'. नवल भाऊ यांचे शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील योगदानही फार मोठे होते.



**स्वातंत्र्य सैनिक चुडामण आनंदा पाटील**

पश्चिम खानदेशातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्व म्हणून चुडामण आनंद पाटील यांचे नाव घेता येईल. १९१३ यावर्षी एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या चुडामण आनंदा पाटील हे त्यांच्यातल्या त्यागी व अविरत श्रम वृत्तीमुळे व प्रयत्नांमधील सातत्य या गुणांमुळे पश्चिम खानदेशात त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते.त्यांचा पश्चिम खानदेशच्या समाज व राजकीय क्षेत्रात दीर्घकाळ सक्रिय सहभाग राहिला आहे. चुडामण आनंदा पाटील यांच्या विचारांवर आचार्य विनोबा भावे आणि महात्मा गांधीजींच्या विचार व व्यक्तिमत्वाचा प्रभाव सुरुवातीपासून दिसून येतो. विनोबाजींच्या भूदान चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग व सहकार्य केले .धुळे परिसरातील बाभूळवाडी, सौंदाणे, वडजाई या गावांमध्ये त्यांनी जागृती केली. गांधीजींच्या नेतत्वाखाली उभारलेल्या सन १९३० च्या देशव्यापी सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला. त्याकाळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस असलेले चुडामन आनंदा पाटील यांनी चले जाव आंदोलन, लळींग जंगल सत्याग्रह, गांधीजींच्या 'करेंगे या मरेंगे' चा नारा देत ब्रिटिशांना हिंदुस्थानातून चालते व्हा..! असे ठणकावून सांगितले. सरकार विरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवून त्यांना ब्रिटिश सरकारने पकडून कैदेत टाकले, त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. त्याकाळी पश्चिम खानदेश अक्षरशः त्यांनी पिंजून काढला .भूमिगत राहून त्यांनी स्वातंत्र्य चळवळ पुढे नेण्याची काम केले. ते मिल कामगार होते.मिल कामगार यूनियनचेही नेतृत्व त्यांनी केले. चुडामण आनंदा पाटील हे दूरगामी नेतृत्व केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी खानदेशात शिक्षणाच्या प्रचारासाठी मोठी पायाभरणी केली. गांधी -नेहरू घराण्याशी त्यांची जवळीकता होती. ते शेवटपर्यंत गांधी-नेहरू घराण्याशी एकनिष्ठ राहिले.१९६२ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यापेक्षा जास्त मते त्यांना मिळाली होती, त्याची देशाच्या राजकीय इतिहासात नोंद घेतली गेली व आजही त्याची चर्चा केली जाते. अलीकडे त्यांच्या संघर्षमय व प्रेरणादायी जीवन प्रवासावर 'अजिंक्य' नावाचा चरित्र ग्रंथ लिहिला गेला. त्यात त्यांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभागापासून ते समाजकारणापर्यंतच्या सर्व पैलूंचा सविस्तर वेध घेण्यात आलेला आहे.

**स्वातंत्र्य सैनिक ॲड. झेड.बी. पाटील**

पश्चिम खानदेशातील स्वातंत्र्य सैनिक झुलाल भिलाजीराव पाटील यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९१४ रोजी मामांच्या गावी खोंडामळी, ता. जि. नंदुरबार येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मुळ गाव असलेल्या अमळनेर तालुक्यातील जळोद, तसेच नंतरचे शिक्षण खोंडामळी, प्रकाशा येथे तर पुढील शिक्षण नंदुरबार व धुळे येथे मराठा बोर्डिंग मध्ये राहुन झाले. पुढे पुणे येथून बी.ए. व एल.एल.बी.उच्च शिक्षणातील पदवी घेतल्यानंतर त्यांनी वकीलीची सनद मिळवून वकीलीचा व्यवसाय सुरु केला.

ॲड.झेड.बी. पाटील यांनी १९३० पासुन स्वदेशी चळवळीत भाग घेत स्वदेशी वस्तुंचा वापर आणि प्रभात फेऱ्यांमध्ये भाग घेऊन सुतकताई व खादीचे कपडे वापरण्यास सुरुवात केली. त्यांच्यावर सुरुवातीपासून गांधी विचारांचा प्रभाव पडलेला होता. महात्मा गांधीजींच्या कायदेभंगाची चळवळ, दांडी यात्रा याविषयी त्यांनी पश्चिम खानदेशात जनजागृती केली. साक्री तालुक्यातील अष्टाने सामुदायिक जंगल सत्याग्रह , चले जाव आंदोलन, लळींग जंगल सत्याग्रह , चिमठाणा खजिना लुटीतील क्रांतिकारकांना देऊर इथून पळून जाण्यासाठी गाडीची सोय करून देणे, खजिना लुटीला मदत करणे, गोवा मुक्ती संग्रामात सक्रिय सहभाग यासारख्या स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता.पश्चिम खानदेशातील सुमारे १०० स्वयंसेवक तयार करून पांझरा नदीकाठच्या विजय व्यायाम शाळेजवळ खादी टोप्या घातलेला मोठा जनसमुदाय जमवून लोकांना जागृत करण्याचे काम केले. धुळे येथे मराठा बोर्डींगमध्ये असतांना प्रथमच त्यांनी सत्याग्रहात सहभाग घेतला.

बहुजन समाजाची उन्नती शिक्षणाशिवाय अशक्य आहे. बहुजन समाजासाठी शिक्षणाची गरज लक्षात घेत त्यांनी धुळे शहरात जय हिंद शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाचे केंद्र निर्माण केले. आज धुळे शहरात ज्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सोयी सुविधा आहेत त्याचे श्रेय ॲड.झेड.बी.पाटील यांना जाते. शिक्षणाबरोबर ते सामाजिक कार्यात देखील अग्रेसर होते. हुंडाबंदी, सामुदायिक विवाह, अंधश्रद्धा निर्मूलन, सत्यशोधक समाज, दुष्काळ व भूकंपग्रस्तांसाठी मदत, शेतकरी व कामगार वर्ग तसेच नर्मदा धरणग्रस्तांसाठीचे आंदोलन हे त्यांचे सामाजिक कार्याचे ठळक वैशिष्ट्ये आहेत.

---

# सिबिल स्कोअर/क्रेडीट स्कोअर सुधारण्याचे प्रभावी उपाय !



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

अर्थवेध

कर्ज मिळवण्यासाठी बँकेत अर्ज केल्यानंतर त्या व्यक्तीचा सीबील स्कोअर तपासला जातो. एखाद्या ग्राहकाचा सिबिल स्कोअर (Cibil Score) त्याचा कर्ज घेतल्याचा व त्याच्या परतफेडीचा इतिहास (Credit History) दर्शवतो. व्यक्तीची ''कर्जाची क्षमता'' आणि त्यांची परतफेडीची क्षमता ती तपासून त्यानंतर संबंधित व्यक्तीला कर्ज द्यावे की नाही, याचा निर्णय बँक घेते. सीबील स्कोअर दाखवतो की, तुम्ही यापूर्वी किती कर्ज घेतले आहे आणि कर्ज परतफेडीला तुम्ही उशीर केला आहे का?




तुमचे सर्व वैयक्तिक तपशील, मागील कर्जाचे तपशील इत्यादी सीबील स्कोअर अहवालात नोंदवले जातात.

ट्रान्स युनियन सिबिल लिमिडेट म्हणजेच क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो (इंडिया) लिमिटेड, याद्वारे प्रत्येक व्यक्तीच्या सीबील किंवा क्रेडिट स्कोरची नोंद ठेवली जाते. क्रेडिट स्कोअर (Credit Score) ३०० ते ९०० दरम्यान असतो. ७०० वा त्यावरील सिबिल स्कोअर चांगला मानण्यात येतो. सिबिल स्कोअर जेवढा चांगला, तेवढे कर्ज मिळणे सोपे होते. उच्च सीबील स्कोअर एक चांगली क्रेडिट प्रोफाइल दर्शवते आणि कर्ज आणि क्रेडिट कार्ड मंजूर होण्याची शक्यता वाढवते. अशावेळी बँकांकडून कमी व्याजदरात गृह कर्ज, कार कर्ज, व्यवसाय कर्ज मिळू शकते.

जर तुम्ही आज पर्यंत कधीच कोणतेही कर्ज घेतले नसेल, तुम्ही क्रेडिट कार्ड वापरत नसाल, तर तुमची क्रेडिट हिस्ट्री तयार होत नाही. त्यामुळे तुमचा क्रेडिट स्कोअर शून्य असतो. सिबिल स्कोअर शून्य असला तरी, बँका त्या व्यक्तीच्या उत्पन्नाचे साधन, त्याची शैक्षणिक गुणवत्ता याची माहिती घेते. त्याची आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी बँकेच्या स्टेटमेंटची चाचपणी करण्यात येते. त्यामध्ये तुमच्या आर्थिक व्यवहाराची हिस्ट्री मिळते. त्याआधारे कर्जाची प्रक्रिया पूर्ण केली जाते.

**सिबिल स्कोअर का महत्त्वाचा आहे?**

१) सीबील स्कोर हा एखाद्या व्यक्तीच्या आर्थिक पतयोग्यतेचे मोजमाप आहे. उच्च सीबील स्कोअर सूचित करतो की एखादी व्यक्ती त्यांच्या कर्जाची आणि क्रेडिट कार्डची बिले वेळेवर परत करण्याची अधिक शक्यता असते. हे त्यांना बँकसाठी अधिक आकर्षक बनवते आणि त्यांची कर्जे आणि क्रेडिट कार्ड मंजूर होण्याची शक्यता वाढते.

२) चांगला सीबील स्कोअर व्यक्तींना त्यांच्या कर्जावरील चांगल्या व्याजदर आणि अटींवर वाटाघाटी करण्यास मदत करू शकतो. उच्च सीबील स्कोअर असलेल्या कर्जदारांना कर्जदार कमी व्याजदर देऊ शकतात कारण ते कमी जोखीमयुक्त म्हणून पाहिले जातात.

सिबिल स्कोअर कसा मोजला जातो?

सिबिल स्कोअर, ज्याला क्रेडिट स्कोअर असेही म्हणतात, हा ३०० ते ९०० दरम्यान असणारा तीन अंकी स्कोअर आहे. हा स्कोअर ठरवताना व्यक्तीने कर्जाची परतफेड वेळेवर केली आहे की नाही, उपलब्ध कर्जपैकी किती कर्ज वापरले आहे, कर्ज इतिहास किती जुना आहे, कोणत्या प्रकारचे कर्ज वापरले आहे आणि कर्जासाठी किती वेळा चौकशी केली आहे यासारख्या बाबींचा विचार केला जातो.

भारतात TransUnion CIBIL, Experian, CRIF High Mark आणि Equifax हे चार क्रेडिट माहिती ब्युरो आहेत. हे ब्युरो व्यक्तीच्या क्रेडिट व्यवहारांची माहिती ठेवतात आणि त्यावर आधारित क्रेडिट रिपोर्ट तयार करतात.

क्रेडिट स्कोअर मोजताना प्रत्येक क्रेडिट ब्युरो वेगवेगळी पद्धत किंवा स्कोअरिंग मॉडेल वापरू शकते. त्यामुळे एका व्यक्तीचा क्रेडिट स्कोअर वेगवेगळ्या ब्युरोंमध्ये थोडा वेगळा असू शकतो.

सर्वसाधारणपणे क्रेडिट स्कोअर खालीलप्रमाणे असतो:

३००-५७९- खराब
५८०-६६९- योग्य
६७०-७३९- चांगला
७४०-७९९- खुप चांगला
८००-९०० - उत्कृष्ट

सिबिल स्कोअर सुधारण्यासाठी महत्त्वाचे उपाय

१. कर्जाची परतफेड वेळेवर करा

कर्जाची वेळेवर परतफेड करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यात EMI, क्रेडिट कार्डची थकबाकी आणि अन्य कर्जाचे नियमित हप्ते यांचा समावेश होतो. वेळेवर पेमेंट केल्याने तुमचा क्रेडिट स्कोअर सुधारतो आणि भविष्यात कर्ज मिळण्याची संधी वाढते.

२. क्रेडिटकार्ड मर्यादेचा योग्य वापर करा

तुमच्या क्रेडिट युटिलायझेशन रेशो म्हणजेच क्रेडिट कार्डवरील खर्च मर्यादित ठेवा. क्रेडिट मर्यादेच्या फक्त ५०% पर्यंत वापर करणे चांगले मानले जाते. उदाहरणार्थ, जर तुमची क्रेडिट मर्यादा १,००,००० असेल, तर ५०,००० पेक्षा जास्त खर्च टाळावा. यामुळे तुमचा सीबिल स्कोअर सुधारण्यास मदत होते.

३. क्रेडिट अहवाल नियमित तपासा

तुमच्या क्रेडिट अहवालात काही त्रुटी आहेत का हे नियमितपणे तपासा. कधी कधी चुकीची माहिती, फसवे व्यवहार किंवा प्रशासकीय चुका असू शकतात, ज्या तुमच्या स्कोअरवर नकारात्मक परिणाम करू शकतात. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार, दरवर्षी एकदा तुम्हाला मोफत क्रेडिट स्कोअर अहवाल मिळतो, त्यामुळे तो वेळोवेळी तपासा आणि आवश्यक सुधारणा करा.

४. क्रेडिट मिक्स राखण्याचा प्रयत्न करा

क्रेडिट स्कोअर सुधारण्यासाठी सुरक्षित आणि असुरक्षित कर्जांचा समतोल ठेवणे महत्त्वाचे आहे. क्रेडिट कार्ड आणि वैयक्तिक कर्ज हे असुरक्षित कर्ज मानले जातात, तर गृहकर्ज आणि वाहन कर्ज हे सुरक्षित कर्ज मानले जातात. सुरक्षित कर्जाचा योग्य वापर केल्यास तुमचा क्रेडिट स्कोअर सुधारू शकतो.

५. अनेक कर्जांसाठी एकाच वेळी अर्ज करणे टाळा

अल्प कालावधीत खूप जास्त कर्ज किंवा क्रेडिट कार्डसाठी अर्ज केल्यास तुमचा क्रेडिट स्कोअर कमी होऊ शकतो. बँकांना असे वाटू शकते की तुम्ही क्रेडिटवर अवलंबून आहात, त्यामुळे तुमचा अर्ज नाकारला जाऊ शकतो. त्यामुळे अगदी आवश्यक असेल तेव्हाच नवीन कर्जासाठी अर्ज करा.

६. दीर्घ मुदतीसाठी कर्ज घ्या

कर्ज घेताना शक्य असल्यास लांब कालावधीचे कर्ज निवडा. यामुळे EMI कमी होतात आणि वेळेवर परतफेड करणे सोपे जाते. नियमित परतफेड केल्याने तुमचा क्रेडिट स्कोअर सुधारतो.

७. दुसऱ्याच्या कर्जासाठी जामीनदार होण्यापूर्वी विचार करा

जर तुम्ही कोणाच्या कर्जासाठी जामीनदार झाला असाल आणि त्या व्यक्तीने हप्ते वेळेवर भरले नाहीत, तर त्याचा परिणाम तुमच्या क्रेडिट स्कोअरवर होऊ शकतो. त्यामुळे संयुक्त कर्ज किंवा जामीनदार होण्याचा निर्णय घेताना काळजी घ्या.


८. कर्ज नाकारल्यानंतर लगेच नवीन अर्ज करू नका

जर बँकेने कर्ज किंवा क्रेडिट कार्डसाठी तुमचा अर्ज नाकारला असेल, तर थोडा वेळ थांबा आणि तुमचा क्रेडिट स्कोअर सुधारण्याचा प्रयत्न करा. वारंवार नकार मिळाल्यास तुमचा स्कोअर आणखी कमी होऊ शकतो.

वरील सर्व सल्ले पाळल्यास तुमचा क्रेडिट स्कोअर सुधारेल आणि भविष्यात तुम्हाला कमी व्याजदरात आणि सहज कर्ज मिळण्यास मदत होईल.

---

# पावसाचं गाणं आणि अनुभवांची शाळा




पावसाचं गाणं आणि अनुभवांची शाळा

डॉ राजेंद्र रामदास अहिरे, साक्री

मुलं मोठी होत असतात, हे त्यांच्या उंचीतून किंवा वयातूनच लक्षात येत नाही; तर त्यांच्या बोलण्यात, निरीक्षणात आणि रोजच्या छोट्या-छोट्या कृतींमधून ते अधिक स्पष्ट दिसून येतं. चैतन्य आणि चिन्मय यांच्याकडे पाहताना मला हा अनुभव वारंवार येतो. शाळेत जाऊ लागल्यापासून त्यांच्या जगात रोज काहीतरी नवीन घडत असतं आणि त्या प्रत्येक नवीन अनुभवाचा ते आनंदाने आमच्याशी वाटा घेतात.

पूर्वी ''शाळा कशी झाली?'' या प्रश्नावर त्यांचं उत्तर एखाद्या शब्दात संपायचं. ''छान झाली'', ''खेळलो'', ''मजा आली'' एवढंच. पण आता चित्र बदलत आहे. आता ते शाळेत काय शिकले, कोणता खेळ खेळले, शिक्षिकांनी काय सांगितलं, कोणत्या मित्राने काय गंमत केली, कोणतं गाणं म्हणालो, कोणती कविता शिकली, हे सगळं उत्साहाने सांगू लागले आहेत. त्यांच्या त्या निरागस कथनातून शाळेचं एक सुंदर विश्व आमच्यासमोर उभं राहतं.

त्या दिवशीही ते दोघे शाळेतून घरी आले. चेहऱ्यावर नेहमीपेक्षा जास्त आनंद होता. दप्तर एका बाजूला ठेवलं आणि दोघांनी एकदम आवाज दिला,

''बाबा... आज शाळेत खूप मजा आली!''

मीही उत्सुकतेने विचारलं,

''असं काय विशेष झालं आज?''

माझं वाक्य पूर्ण होण्याआधीच दोघेही हॉलच्या मधोमध उभे राहिले. एका हाताने छत्री धरल्याचा अभिनय केला, दुसऱ्या हाताने पावसाच्या सरी दाखवू लागले आणि मोठ्या उत्साहाने गाणं सुरू केलं

''पानी बरसा छम छम छम...
ऊपर छाता, नीचे हम...
पानी बरसा छम छम छम...
ऊपर छाता, नीचे हम...''

गाण्याबरोबर त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव, पावसात चालल्यासारखी पावलं, डोक्यावर छत्री धरल्याची ॲक्शन, पावसाच्या सरी अंगावर झेलल्याचा अभिनय... सगळंच इतकं सहज आणि सुंदर होतं की काही क्षण मी मंत्रमुग्ध होऊन त्यांच्याकडे पाहत राहिलो.

तो माझ्यासाठी खरोखरच एक सुखद धक्का होता.

काही दिवसांपूर्वीपर्यंत बोट धरून चालणारी ही मुलं आज इतक्या आत्मविश्वासाने गाणं सादर करत होती. शाळा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात किती सुंदर बदल घडवत आहे, याची ती जाणीव होती.

गाणं संपलं. त्यांनी आनंदाने विचारलं,

''बाबा, कसं झालं?''

मी टाळ्या वाजवल्या. त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचं हास्य खुललं. पण माझं मन मात्र अचानक काही महिन्यांपूर्वीच्या एका प्रसंगात जाऊन पोहोचलं.

पहिल्या पावसाचा तो दिवस अजूनही डोळ्यांसमोर आहे.

आकाशात काळे ढग दाटून आले होते. काही क्षणांतच पावसाच्या टपोऱ्या सरी कोसळू लागल्या. चैतन्य आणि चिन्मय खिडकीतून बाहेर पाहत होते. पाऊस पाहताच त्यांच्या डोळ्यांत चमक आली. त्यांनी बाहेर जाण्याचा हट्ट धरला. थोड्याच वेळात ते अंगणात पोहोचले.

पहिल्या पावसाचा तो निरागस आनंद शब्दांत मावणारा नव्हता. साचलेल्या पाण्यात उड्या मारणे, पायाने पाणी उडवणे, पावसाचे थेंब अंगावर झेलणे, आकाशाकडे पाहत खळखळून हसणे... त्यांच्या प्रत्येक हालचालीत बालपणाचा मुक्त आनंद ओसंडून वाहत होता.

त्या वेळी त्यांच्या मनात कोणतंही गाणं नव्हतं, कोणती कविता नव्हती. पाऊस हा त्यांच्यासाठी फक्त अनुभव होतानिखळ, निष्पाप आणि आनंदाने भरलेला.

आज परिस्थिती वेगळी होती.

आज त्या अनुभवाला शब्द मिळाले होते.



शाळेने त्या आनंदाला सुरांची साथ दिली होती. ''पानी बरसा छम छम छम...'' हे गाणं म्हणताना ते फक्त शब्द उच्चारत नव्हते; ते काही दिवसांपूर्वी जगलेला पाऊस पुन्हा एकदा अनुभवत होते.

मला त्या क्षणी शिक्षणाचा एक अत्यंत सुंदर अर्थ उमगला.

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकातील धडे पाठ करणे नव्हे. मुलांनी अनुभवलेल्या जगाला शब्द देणं, त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी भाषा देणं, त्यांच्या कल्पनाशक्तीला पंख देणं आणि त्यांच्या आनंदाला अभिव्यक्ती देणं म्हणजे खरं शिक्षण.शाळा मुलांना फक्त अक्षरं शिकवत नाही; ती अनुभवांना अर्थ देते.

लहान मुलांचं शिक्षण हे गाण्यांतून, खेळातून, गोष्टींतून आणि कृतीतून अधिक प्रभावी होतं. म्हणूनच बालवाडीतील प्रत्येक कविता, प्रत्येक खेळ आणि प्रत्येक ॲक्शन ही त्यांच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वाचा भाग असते. मुलं शिकत असतात, पण त्यांना शिकतो आहोत असं वाटतही नाही. त्यांच्यासाठी ते सगळं म्हणजे आनंदाचा उत्सव असतो.

चैतन्य आणि चिन्मयकडे पाहताना मला अनेकदा वाटतं, आपण मोठी माणसं आयुष्याकडे किती गुंतागुंतीने पाहतो! प्रत्येक गोष्टीत कारण शोधतो, परिणाम मोजतो, फायदा-तोट्याचा विचार करतो. पण मुलं मात्र प्रत्येक क्षण मनापासून जगतात. पावसाचा एक थेंब, कागदाची एक होडी, एखादं छोटंसं गाणं किंवा शिक्षिकेची शाबासकीही त्यांच्या आनंदाचं कारण बनते.

त्यांच्याकडून आपणही शिकण्यासारखं खूप काही असतं.

त्या दिवशी त्यांनी मला गाणं दाखवलं; पण नकळत त्यांनी शिक्षणाचं एक मोठं तत्त्वज्ञान समजावून सांगितलं. अनुभव आधी येतो आणि ज्ञान नंतर त्याला आकार देतं. अनुभव आणि शिक्षण यांची सांगड घातली की शिकणं कायमचं मनात कोरलं जातं.

त्या संध्याकाळी ते पुन्हा तेच गाणं म्हणत होते. प्रत्येक वेळी त्यांच्या चेहऱ्यावर तोच उत्साह, तीच निरागसता आणि तोच आनंद दिसत होता. मी मात्र त्यांच्या गाण्याबरोबर माझ्या मनातल्या आठवणींच्या पावसात भिजत होतो.


आजही जेव्हा पावसाची पहिली सर कोसळते, तेव्हा त्या दोन छोट्या चेहऱ्यांवरील आनंद आठवतो. आणि त्याचबरोबर कानात पुन्हा तेच निरागस स्वर घुमू लागतात

''पानी बरसा छम छम छम...
ऊपर छाता, नीचे हम...''

त्या स्वरांमध्ये केवळ एका बालगीताची लय नाही; त्यात बालपणाचा निरागस आनंद, अनुभवातून घडणारं शिक्षण, शाळेची सुंदर संस्कारप्रक्रिया आणि आजोबांच्या मनात कायमची जपली गेलेली एक गोड आठवण दडलेली आहे.


आयुष्यातील मोठ्या घटना काळाच्या ओघात कधी कधी विस्मृतीत जातात; पण मुलांच्या बालपणातील अशा छोट्या-छोट्या आठवणी मनाच्या कप्प्यात कायमच्या घर करून राहतात. कारण त्या केवळ आठवणी नसतात, त्या आयुष्याला पुन्हा एकदा निरागस नजरेने पाहायला शिकवणाऱ्या जिवंत शिकवणी असतात.

# श्रावण.. लाडका श्रावण..



श्रावणातला झुला झुले मनी मम
झुल्यात श्रावण दरवळतो
सरसर धारा पाऊस वारा
केवड्यात तो परमळतो..
झिम्माड झिम्म आभाळ टम्म
चाळणीतुनी झरझरतो
उन्हात पिवळ्या पानाआडून
आभाळी तो खळबळतो..
मध्ये कोवळे सोनपिवळे
फांदीला लगडून सोने
सरसर येती तशात धारा
पिवळीधम्मक ती पाने
रंगांचा तो महाल खुले मग
अवघ्या रंगांची रांगोळी
बदके उडती अवकाशी ती
धनुष्यबाणाच्या ओळी..
ऊनपाऊस मिलाफ होता
धारांमधूनी इंद्रधनू
वर्णावी ती सांज कशी हो
प्रसन्नतेची धून जणू
झाडे न्हाती पक्षी गाती
घरट्यातूनी ओलीबोली
रस्त्यातून पागोळ्या उडती
भिजून जाते गलीगली..
ललना जाती, शृंगाराचा
साज लेवूनी किणकिणती
घंटानादे परिसर सारा
मंदिरातली ती पणती..
प्रसन्नतेचा वसाच घेऊन
सुमने फुलवी श्रावण
नभी बघा वा, बघा अंगणी
मनास करतो पावन..
हुरहुर लागे मनी अनामिक
फुलपाखरू मी व्हावे
नभात गिरकी मारून यावे
पवन होऊनी झोकावे
अवघा देहच आनंदाचा
मनात फुलती रानफुले
झरझरणाऱ्या श्रावणात या
वसुंधरेला हरएक भुले

**–प्रा. सौ. सुमती पवार**
नाशिक, मो. ९७६३६०५६४२



## लोकमाता अहिल्या

धर्माचा कळसासारखी उभी होती
न्यायाचा तुळसासारखी पवित्र होती
मालवाची राणी पण जनतेची माता
अहिल्याबाई नाव, इतिहासाची गाथा
सूर्यासारखा तेज होता डोळ्यात
नदीसारखा ओघ होता वाणीत
काशीचे मंदिर जसे तीर्थ बनले
तिच्या हाताने भारत सारे सजले
धर्माचा कळसासारखी उभी होती..
तलवारीसारखी ती शत्रूला भेदे
आईसारखी ती प्रजेला जपे
महेश्वर नगरी जशी स्वर्ग झाली
तिच्या कारभाराने भूमी धन्य झाली
धर्माचा कळसासारखी उभी होती...
दीपस्तंभा सारखी वाट दाखवली
वटवृक्षासारखी छाया दिली
जात-धर्म न बघता सेवा केली
म्हणूनच लोकमाता पदवी मिळाली
धर्माचा कळसासारखी उभी होती
न्यायाचा तुळसासारखी पवित्र होती...

**–प्रभाकर गजमल भामरे**
मेहेरगाव, धुळे

## आला श्रावण श्रावण

आला श्रावण श्रावण
मन भावन पावन
येई पाठीशी धाऊन
विठू सावळा श्रावण !!१!!
नाग पंचमीचा सण
जन्म अष्टमी श्रावण
राखी बांधून औक्षण
बंधू रक्षितो बहिण !!२!!
सर तुषार श्रावण
ऊन सावली श्रावण
ऐका कोकिळेचं गाणं
रान हिरवे श्रावण!!३!!
पडे भुरळ श्रावण
प्रेम वेडा हा श्रावण
कुठे जगात श्रावण
भुमि भारती श्रावण!!४!!
येता मास हा श्रावण
जातो बळी आनंदून
बैल खिल्लारी हो जोडी
सण पोळा मोल जाण !!५!!
नभी भिणला श्रावण
शेती मातीत श्रावण
राब राबून राबून
सोनं पिकवी श्रावण !!६!!
आला श्रावण श्रावण
लेकी भिजल्या नाचून
ढोल ताशे वाजवून
ताल धरती तरूण !!७!!
आला श्रावण श्रावण
पुलकित तन-मन
दवबिंदू तृणावर
मोत्या समान श्रावण !!८!!

**–चंद्रशेखर कासार**
चांदवडकर, धुळे.
मो.८२०८६६७४७७

## राखू या शान तिरंग्याची

साऱ्या जगात देश आपला
आहे बहू महान
सारे जहासे अच्छा आपला
भारत सुंदर छान !!
विंध्य हिमाचल यमुना गंगा
कोरीव लेणी वेरूळ अजिंठा
कुतुबमिनार अन् ताजमहाल
द्वारका काशी अन् रामेश्वर
काश्मीर केरळ निसर्गरम्य !!
या रे सारे या रे सारे
एकच होवू या रे
एक होऊनी आपण
आपला काश्मीर वाचवू या रे
हिंदू, मुस्लीम,सीख, इसाई
आपण सारे भाई भाई
भारतमाता आपली आई !!
पंजाबी आम्ही,सिंधीआम्ही
गुजराथीआम्ही,महाराष्ट्रीयआम्ही
बंगाली आम्ही,तामिळी आम्ही
वेगवेगळी वेषभुषा ही
वेगवेगळी भाषा आमुची
वेगवेगळा धर्मपंथ तरी
भारतभुशी आमुची नाती
साऱ्यांच्या देहातील रक्ताचा
रंग असे हा एक
साऱ्या धर्माहूनही श्रेष्ठ
मानवधर्म हा एक
समता बंधुता आणि एकता
म.फुलेंची शिकवण ध्यानी ठेवता
भेदभाव सारा विसरुनी रुजवू
मनोमनी राष्ट्रीय एकता !!
शेतकऱ्यांचा,कष्टकऱ्यांचा
सीमा सुरक्षा सैनिकांचा
पवित्र उज्वल परंपरेची
खाण असे हा महान भारत
पवित्र ऐशा भुमीवरती
आतंकवादी का आतंक करीती ?
मंदिरात का आतंक करुनी
निर्घुण ऐशी हत्या करिती ?
सापडले जरी तावडीत
आमुच्या आतंकवादी
सोडणार ना त्याला आम्ही
गेलेत प्राण कितीजरी
सारा भारत वाचवण्याला
तिरंगा आपला नीत फडकवण्या
आपण सारे एकजुटीने
सज्ज राहू या देशासाठी !!

**–विमल प्रकाश पाटकरी**
देवपूर, धुळे
मो.नं.९०२८०५५९११

## आरोग्यम् धनसंपदा

**डॉ.नितिन जाधव**
संजीवन चिकित्सक, डोंबिवली
९८९२३०६०९२.

# शिंका येणे

सकाळ उगवते तीच मुळी शिंकांनी. सटासट. उसंतही घेऊ न देता शिंका येतात. दहा-बारा शिंका येऊन पुरते बेजार व्हायला होते. ही वेळ कधीही येऊ शकते. एखादी महत्त्वाची बैठक सुरू आहे, तेवढ्यात शिंका सुरू. या शिंका येतात, ऍलर्जीमुळे.

**ऍलर्जीमुळे सायनस'चा त्रास कसा सुरू होतो?**

सायनस म्हणजे नाकाभोवतीच्या हाडांमध्ये असणारी पोकळ जागा. या पोकळीचे तोंड नाकात उघडते. नाकामधील आंतरत्वचेला ओलावा आणण्यास सायनसेस' एक ते दीड लिटर स्राव तयार करतात; परंतु सायनसची वाट किंवा तोंड (नाकात सूज आल्यामुळे) बंद झाल्यास सायनसमधील स्राव बाहेर पडू शकत नाही. स्राव साठल्यामुळे जंतुसंसर्ग होऊन सायनसचे इन्फेक्शसन' होते. ही सूज मूलतः ऍलर्जीमुळे येते, त्यामुळे डोके दुखणे, चेहेरा व डोके जड होणे, थकवा येणे, दिवसभर निरुत्साही वाटणे, कामावरील तसेच अभ्यासातील एकाग्रता कमी होणे व शारीरिक चलनवलन कमी होणे ही लक्षणे आढळतात.

अनेक वर्षांचा त्रास असल्यास त्याचे परिवर्तन परत परत होणाऱ्या अथवा ऱ्हिनोसायन सिटीस मध्ये होऊ शकते. काही लोकांमध्ये सर्दी दाटून पोलिप तयार होतात व सर्व प्रकारचे वास येणे बंद होते, औषधांमुळे सायनस इन्फेक्श न दूर न झाल्यास दुर्बिणीद्वारा अगदी अलगदपणे ही सायनसची तोंडे उघडता येतात; पण काही कालावधीनंतर ऍलर्जीचा कायम स्वरूपी उपचार न केल्याने ती पुन्हा बंद होऊ शकतात. सर्दीच्या योग्य उपायांमुळे सायनस मोकळे राहते व परत परत सायनसच्या



इन्फेक्शतनची शक्यचता कमी होते.

**ऍलर्जी म्हणजे काय?**

प्रतिकारशक्तीचे मुख्य काम म्हणजे विविध जंतूविरुद्ध शरीराचे संरक्षण करणे. याकरिता आपल्या प्रतिकारशक्तीने शरीराला धोका निर्माण करणाऱ्या व धोका न निर्माण करणाऱ्या गोष्टी ओळखल्या पाहिजेत. ऍलर्जी म्हणजे निसर्गामधील घटकांना शरीराने दिलेला अनैसर्गिक प्रतिसाद होय. हा असा प्रतिसाद शरीराला घातक ठरू शकतो. कारण या घटकांना प्रतिपिंड (antibody) तयार होऊन हिस्टामाईन नावाचे द्रव्य तयार होते.

**ते कसे शोधून काढायचे?**

तपासणीसाठी त्वचा सर्वांत उपयोगी पडते. ऍलर्जीची औषधे चालू नसल्यास त्वचेची चाचणी रक्ताच्या तापसणीपेक्षा चांगले निष्कर्ष देते. ऍलर्जी वरील कायमस्वरूपी उपचाराला इम्युनोथेरपी' असे म्हणतात.

**इम्युनोथेरपी म्हणजे काय?**

या उपायांमध्ये ऍलर्जीच्या प्रतिपिंडांना प्रतिबंध केला जातो. हिस्टामाईन हे द्रव्य ऍलर्जीचे माध्यम समजले जाते. हिस्टामाईन विरुद्ध काम करणारी औषधे फक्त ऍलर्जीची लक्षणे थांबवतात. ऍलर्जी होण्याकरता झालेल्या परिणामांचा प्रादुर्भाव थांबवू शकत नाहीत.

इम्युनोथेरपीमध्ये ऍलर्जीचा प्रादुर्भाव होणार नाही याबाबत दक्षता घेतली जाते. मग शरीराचा बाह्य ऍलर्जीनिक द्रव्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. एक ते पाच वर्षे ज्या रुग्णांनी हा उपचार केलेला आहे, त्या रुग्णांमध्ये याचे दीर्घकाळ फायदे आढळून येतात. प्रत्येक रुग्णामध्ये हा उपाय पूर्णतः लागू होईलच असे नाही; पण हा उपचार केल्यास ऍलर्जीमुळे होणारा त्रास कमी होतो किंवा औषधाची गरज कमी भासते. जे रुग्ण ठराविक द्रव्याची ऍलर्जी असूनसुद्धा त्यांना टाळू शकत नाहीत किंवा ज्यांना औषध घेऊनसुद्धा ऍलर्जीचा त्रास होत आहे. त्यांनी हा उपचार अवलंबावा यामुळे ते दैनंदिन जीवन सुखाने जगू शकतील. खाद्य पदार्थांच्या किंवा औषधांच्या ऍलर्जीसाठी मात्र हा उपाय अतिशय अवघड आहे. ऍलर्जीवर काम करणारा प्रतिबंधात्मक उपाय हा विशष उपचार केंद्रात (स्पेशल क्लिननिक)मध्ये केला जातो. नाक, सायनस, श्वारसनलिकेच्या ऍलर्जीमध्ये हा नक्कीच उपयोगी ठरतो. जिभेच्या खाली याची लस देता येते. हळूहळू लसीचे प्रमाण वाढवले की ऍलर्जीचा त्रास कमी होतो. त्रास देणारी द्रव्ये शरीरात असूनसुद्धा प्रतिपिंड निर्माण करण्यासाठी रक्ताला उत्तेजित करणारा पदार्थ व प्रतिपिंड यांचा त्रास होत नाही. हिस्टामिन हे द्रव्य तयार न झाल्याने ऍलर्जीचे परिणाम दिसत नाहीत.

# 'एक कप चहा.. पंधरा कोटींची माणुसकी'

(पान ४ वरुन) तो फोटो पाहताच अनन्याच्या तोंडून किंकाळीच फुटली. फोटोमध्ये सूट घातलेला, अतिशय राजेशाही थाटात उभा असलेला एक वृद्ध माणूस होता. त्याचा चेहरा, त्याचे ते तीक्ष्ण डोळे हुबेहूब त्या म्हाताऱ्या भिकाऱ्यासारखे होते! फक्त या फोटोत तो अत्यंत श्रीमंत दिसत होता.

''बाबा? हे... हे तर गोरेगाव स्टेशनबाहेर बसणारे बाबा आहेत! हे भिकारी कसे असू शकतात?'' अनन्याने विचारले. वकिलाच्या डोळ्यात पाणी आले. तो सांगू लागला, ''हे भिकारी नव्हते अनन्या. हे 'सिंघानिया ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज'चे मालक होते. त्यांचे वय ७२ वर्षे होते. आजपासून दोन वर्षांपूर्वी त्यांच्या एकुलत्या एक मुलाचा आणि सुनेचा एका विमान अपघातात मृत्यू झाला. त्या धक्क्यातून ते कधीच सावरले नाहीत. त्यांच्या अब्जावधींच्या संपत्तीला कोणी वारस नव्हता. नातेवाईक फक्त त्यांच्या पैशावर डोळा ठेवून होते. रणजीतसिंग यांचे मन या जगातून उडाले. त्यांना पाहायचे होते की, या जगात अजूनही माणुसकी जिवंत आहे का? लोक फक्त पैशाला पुजतात की माणसाला?'' वकील पुढे म्हणाला, ''सहा महिन्यांपूर्वी त्यांनी एक निर्णय घेतला. ते घर सोडून बाहेर पडले. त्यांनी स्वतःचे रूप बदलले आणि ते गोरेगाव स्टेशनबाहेर एका सामान्य भिकाऱ्यासारखे राहू लागले. त्यांनी स्वतःला एका परीक्षेला बसवले होते. ते पाहत होते की, या अथांग मुंबईत त्यांच्या या रूपाला पाहून कोण त्यांना मदत करते. हजारो लोक त्यांच्यावरून पाय देऊन निघून गेले. श्रीमंत गाड्यांमधून उतरणाऱ्या लोकांनी त्यांना खडे वेचायला लावले. पण... पण फक्त तुम्ही एकटी होता, जिने त्या म्हाताऱ्या भिकाऱ्यामध्ये एका माणसाला पाहिले.''

कॉन्फरन्स रूममध्ये शांतता पसरली होती. अनन्याचे अश्रू तिच्या गालावरून घसरत होते.

''रणजीतसिंग यांनी त्यांच्या मृत्युपत्रात स्पष्ट लिहिले होते,'' वकिलाने अधिकृत कागदपत्र पुढे केले. ''ते लिहायचे की 'माझ्या अब्जावधीच्या संपत्तीला खरा वारसदार तोच असेल, जो मला माझ्या कठीण काळात, माझ्या भिकारी रूपात कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रेम देईल. अनन्या नावाच्या त्या मुलीने मला रोज सकाळी चहा दिला नाही, तर जगण्याची उमेद दिली. तिने मला तिच्या वडिलांसारखं मानलं. जेव्हा संपूर्ण जग माझ्यावर थुंकत होतं, तेव्हा ती माझ्या डोक्यावर छत्री धरून उभी होती. म्हणूनच, माझ्या पश्चात् माझ्या वैयक्तिक ट्रस्टचे पंधरा कोटी रुपये आणि मुंबईतील माझी मुख्य प्रॉपर्टी मी अनन्या देशपांडे हिच्या नावावर करत आहे.'''

वकिलाने सांगितले, ''काल रात्री त्यांचे वृद्धापकाळाने आणि हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळंच समाधान होतं. त्यांनी मरण्यापूर्वी मला फोन करून सांगितले होते की, अनन्याच्या वडिलांच्या ऑपरेशनचे पैसे तातडीने जमा झाले पाहिजेत. म्हणून आज सकाळी आम्ही ही प्रक्रिया पूर्ण केली.''अनन्या त्या कागदपत्रांकडे पाहत राहिली. तिच्या डोळ्यांसमोर तो सिग्नलचा खांब, ती रिमझिम व त्या म्हाताऱ्या बाबांचा तो मायेचा स्पर्श फिरून गेला. ज्या माणसाला ती रोज एक साधा चहा देत होती, त्याने तिच्या संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य बदलून टाकले होते. तिने त्या लाकडी काठीला स्पर्श केला आणि तिचे डोके तिच्यावर टेकवले.

''थँक यू बाबा...'' तिच्या तोंडून शब्द बाहेर पडले. दोन दिवसांनंतर, सदाशिव यांच्यावर मुंबईतील सर्वात मोठ्या हॉस्पिटलमध्ये यशस्वी बायपास शस्त्रक्रिया झाली. ते आता पूर्णपणे बरे झाले होते. जेव्हा त्यांना ही हकीकत समजली, तेव्हा त्यांच्या डोळ्यातून अश्रू थांबत नव्हते. त्यांनी अनन्याचा हात हातात घेतला आणि म्हणाले, ''बाळा, तुझी माणुसकी आज आपल्याला तारून गेली.'' अनन्याने त्या पंधरा कोटी रुपयांमधून स्वतःसाठी मोठा बंगला किंवा गाडी खरेदी केली नाही. तिने गोरेगाव स्टेशनबाहेर एक मोठे 'रणजीतसिंग सिंघानिया चॅरिटेबल ट्रस्ट' सुरू केले. त्या ट्रस्टच्या माध्यमातून रोज सकाळी हजारो गरीब, अनाथ आणि भुकेलेल्या लोकांना मोफत चहा आणि सकस नाश्ता दिला जाऊ लागला. अनन्या आता त्या ट्रस्टची मुख्य संचालक होती. ती सुटाबुटात असायची, पण रोज सकाळी साडेपाच वाजता ती स्वतः स्टेशनबाहेर यायची.आजही त्या सिग्नलच्या खांबापाशी तिने रणजीतसिंग सिंघानिया यांचा एक छोटा, हसरा पुतळा बसवला होता. अनन्या रोज सकाळी पहिला चहा त्या पुतळ्यासमोर ठेवायची. तिच्या आयुष्यातील तो संघर्ष संपला होता, पण तिच्या मनातील माणुसकी आणि तो चहाचा सुगंध आजही तसाच जिवंत होता. बदललेल्या आयुष्यातही तिचे पाय जमिनीवरच होते, कारण तिला माहीत होते की, श्रीमंती पैशात नसते, तर भुकेलेल्याला चहा देणाऱ्या त्या हातांमध्ये असते. ही कथा पूर्णपणे काल्पनिक असून तिचा कोणत्याही जिवंत किंवा मृत व्यक्ती, घटना, संस्था किंवा वास्तविक प्रसंगाशी कोणताही संबंध नाही. कथेमधील सर्व पात्रे, घटना आणि प्रसंग हे केवळ मनोरंजनासाठी रचलेले आहेत. कोणतेही साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.



**सुमेध रानडे**
मो.९५६१०९३७४०

# राशी भविष्य

## २३ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट

**कर्क वृश्चिक धनू कुंभ**
**या राशींना लाल थांबा**
**वृषभ मिथुन मकर मीन**
**या राशींना पिवळा दिवा**
**मेष सिंह कन्या तूळ**
**या राशींना हिरवा झेंडा**



**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी सोबतीने पुढे वाढण्याचा असणार आहे. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांचे चांगले सहकार्य मिळेल. घरामध्ये जोडीदाराकडून अपेक्षित किंवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात साहचर्य मिळेल. दुरावलेली नाती पुन्हा जवळ येतील. प्रेम आणि नात्यांच्या बाबतीत आनंददायी घटना घडेल. विवाहास अनुकलता मिळेल. साथ संगतीमुळे अवघड मार्ग सोपा होईल! या आठवड्यात तुम्हाला एकटे राहण्यापेक्षा इतरांच्या सोबत राहणे जास्त फायद्याचे ठरणार आहे. एखाद्या कलेतून आनंद मिळवा. बुध्दीचा तर्क बाजूला ठेवून भावना समजून घ्या.

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा आहे. तुम्ही एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोचणार आहात. मागे केलेल्या नियोजनाला आणि कष्टाला चांगले यश मिळेल. पण मार्गावर पुढे जाण्यासाठी कुठल्यातरी गोष्टीची वाट बघावी लागेल. लोकांचं सहकार्य मिळेल. यात्रा किंवा प्रवास संभवतात. नोकरी व्यवसायात अपेक्षित घटना घडायला वेळ लागेल. या आठवड्यात तुम्हाला धैर्य आणि संयम ठेवण्याची गरज आहे. आहात त्या मार्गावर पुढे जाताना, विचारमंथन करा, इतरांचे मत जाणून घ्या. कामाचा विस्तार कसा करता येईल हा विचार करा.

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जायुक्त असणार आहे. तुम्ही तुमच्या ध्येयपूर्तीसाठी एक पाऊल पुढे टाकू शकणार आहात. झटपट घडामोडी घडू शकतात. तुमच्या नोकरीत, व्यवसायात किंवा घरातील आवडीच्या कामात एक प्रकारे नवीन चांगली चालना मिळेल. अडथळे येतील पण त्यावर तुम्ही कुशलतेने मात करू शकाल. काही प्रवास घडू शकतात त्यातून तुम्हाला आनंद होईल. या आठवड्यात तुम्ही तुम्हाला जे साध्य करायचं आहे त्यावर एकाग्रपणे काम करा. लक्ष विचलित होऊ देऊ नका. इतरांना देखील घेऊन पुढे चाला. आळस अजिबात नको.

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा आहे. पुष्कळ घडामोडी पटापट घडण्याचा हा काळ असणार आहे. तुमच्या विचारसरणीला धक्का लागू शकतो. विभक्त होणे किंवा फूट पडणे किंवा मतभेद होऊन वाद होणे अशी परिस्थीती निर्माण होऊ शकते पण तुमचे संयम आणि धैर्य तुम्हाला यातून तारून नेईल! कशीही परिस्थीती आली तरी खचून न जाता, धीराने सामोरे जायचे आहे. लहानसहान भांडणे विकोपाला नेऊ नका, संयम आणि शांतता ठेवा. काही निरुपयोगी गोष्टी सोडून द्या, कचरा टाकून द्या. बदलत्या गोष्टींत सहभागी व्हा.

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा असणार आहे. आत्तापर्यंत सुरू असलेल्या समस्यांमध्ये काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. तुम्ही आतुरतेने वाट बघत असलेले उत्तर किंवा प्रतिसाद मिळेल. एका अर्थी तुम्ही सुटकेचा निःश्वास टाकाल. तुम्ही करत असलेली प्रार्थना किंवा उपासना यांना बळ मिळेल. या आठवड्यात तुम्ही परिस्थितीला तोंड देताना मनामध्ये श्रद्धा आणि विश्वास ठेवण्याची गरज आहे. तुमची साधना फलित होईल असा विश्वास ठेवा. ''सुरवंटाचेच फुलपाखरु होते'' हे लक्षात ठेवा!

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी उत्साहाचा आणि आनंदाचा आहे. एखादं काम पूर्णत्वास जाऊ शकते. तुम्हाला अपेक्षित यश मिळण्याची शक्यता आहे. ज्या मार्गावर आहात तिथे खंबीरपणे पुढे जाऊ शकाल. अडथळे दूर होतील, त्यांना पार करण्याची शक्ती तुमच्याकडे असेल. या आठवड्यात तुम्हाला तुमचा आवाज लोकांपर्यंत पोचण्याची गरज आहे. बुजरेपणा झटकून पुढे या. परिस्थितीशी दोन हात करा. आत्मविश्वास ठेवा फक्त त्याचा अतिरेक नको! गरज पडेल तसे पुढे होऊन नेतृत्व करा. बदल घडण्याची वाट बघू नका, तो स्वतः घडवून आणण्यासाठी प्रयत्न करा!

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी आर्थिक मुबलकता घेऊन येत आहे. तुम्ही वस्तू, पैसे, लोक, कौशल्य यांनी युक्त असाल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाल. घराबाबत किंवा जमिनीबाबत चांगली घटना घडेल. कौटुंबिक आनंद राहील. या आठवड्यात तुम्हाला तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आर्थिक नियोजन नीट करा. कुठे आर्थिक गुंतवणूक करायची असेल तर करू शकता. लोकांना मदत करा. सगळ्यांचा सांभाळ करा. व्यावहारिक वागा, पण तुटक वागू नका. दानधर्म करा. गृहलक्ष्मीला प्रसन्न ठेवा!

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी एकाच वेळी खूप पर्याय घेऊन येणार आहे. निरनिराळ्या गोष्टींमुळे निर्णय घ्यायला अवघड जाईल. मल्टी टास्किंग करावं लागेल. पण यांपैकी कोणतीही गोष्ट हवी तशी पुढे सरकणार नाही. एकूण थोडी तारांबळ उडण्याची शक्यता आहे. हवे ते साध्य होण्यासाठी अजून वेळ लागेल. या आठवड्यात तुम्ही बऱ्याच गोष्टींमधून एक दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा. खूप काही करायला जाऊ नका, फसवणूक संभवते. वरवर आकर्षक वाटणाऱ्या कुठल्याही गोष्टीला भुलू नका. स्वप्नरंजन करत बसू नका!

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी मध्यांतराचा आहे. खूप कष्ट करुन, बरेच अडथळे ओलांडून तुम्ही एका टप्प्यावर येऊन पोचल्याने आता तुम्हाला थोडा वेळ तरी आरामाची गरज वाटणार आहे. कामे संथपणे होतील. अपेक्षित उत्तरं, अपेक्षित प्रतिसाद मिळणार नाही. एका जागी थांबून रहाल. पण चुकीचे वळण घेण्यापेक्षा आहे तिथे थांबणे योग्य असते! या आठवड्यात तुम्हाला काही प्रमाणात विश्रांती घेण्याची गरज आहे. धावाधाव थांबवा. जमेल तेवढंच काम करा, दडपण घेऊ नका. अतिविचार टाळा. प्रकृतीकडे लक्ष द्या. ध्यान मेडिटेशनचा तुम्हाला चांगला फायदा होईल!

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी भावभावनांचं प्राधान्य घेऊन येत आहे. तुम्ही आनंदी राहणार आहात. तुम्हाला तुमच्या मनाचा कौल घेऊन, बुध्दी आणि इतर व्यवहारिक गोष्टींपेक्षा मन काय सांगत आहे त्याप्रमाणे वागून चांगला अनुभव येईल. कठीण परिस्थितीसुद्धा सकारात्मकतेने हाताळू शकाल. कला क्षेत्रात चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही भावनांमध्ये वाहवत जात नाही आहात ना, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. कोणामध्येही भावनिक दृष्ट्या अडकू नका. तुम्हाला आवडणारा एखादा छंद किंवा एखादी कला आत्मसात करा, त्यात वेळ घालवा.

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी संभ्रम निर्माण करणारा वाटू शकतो. अनेकविध विचारांनी मनावर परिणाम होऊ शकतो. निर्णय घेणं अवघड वाटू शकतं. तुम्ही ठरवलेल्या कामात किंवा तुम्ही आखलेल्या नियोजनात फार गती येणार नाही. एक प्रकारची स्तब्धता येऊ शकते. गोष्टी हव्या तशा पुढे सरकणार नाहीत. अकारण विलंब होऊ शकतो. या आठवड्यात तुम्ही शांत बसून, तोलून मापून विचार करून पुढे जाण्याची गरज आहे. निर्णय घेताना बुद्धीने, सारासार विचार करून घ्या. ध्यान, उपासना करा.

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी स्थैर्य आणि दिलासा घेऊन येत आहे. तुम्ही तुमच्या कामात संथ पण सबळ वाटचाल करणार आहात. काही अडथळे किंवा अडचणी येऊ शकतात पण त्यातून तुम्ही आणखी मजबूत आणि सक्षम होणार आहात. प्रवास घडू शकतात. आर्थिक गोष्टी मार्गी लागतील. पण फळ मात्र सावकाश मिळेल म्हणून संयम ठेवा! या आठवड्यात तुम्ही कामात खूप कष्ट करा. जीव ओतून प्रामाणिक प्रयत्न करा. घाई न करता कोणतेही काम अधिक चांगले आणि परिपूर्ण कसे करता येईल याकडे लक्ष द्या.

**पान १ वरुन**

## कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करा

दहा वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा असलेल्या गटप्रवर्तकांना शासकीय सेवेत समायोजन करण्यात यावे. गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन, भत्ते व इतर सुविधा द्यावी. आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक यांचे सेवा निवृत्ती वय ६५ करा, पेन्शन कायदा लागु करा, दरमहा दहा तारखेच्या आत मानधन, मोबदला द्या. किमान वेतन कायदा लागु करावा, ऑनलाईन कामासाठी मोबाईल, टॅब, व गटप्रवर्तकांना लॅपटॉप द्यावा, प्रवास भत्त्यात पाचशे रूपये वाढ करावी. आदिंचा समावेश आहे. निवेदन देतांना महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटना धुळेचे कॉ. वसंतराव पाटील, शारदा पाटील, तेजल पाटील, सुनिता पाटील, माधुरी शिंदे, अलका बिरारीस, प्रतिभा गिरासे, शशिकला देवरे, अनिता निकम, शालिनी सैंदाणे, सुरेखा देवरे, योगिता पाटील, कल्पना ठाकरे आदि उपस्थित होते.

## कात्री-तोरखापाड्यात चारा लागवड मोहिम

या उपक्रमासाठी डॉक्टर हेडगेवार सेवा समिती, नंदुरबारचे उपाध्यक्ष जात्र्या बाबा पावरा यांचेही विशेष सहकार्य लाभले. स्थानिक पातळीवरील प्रशासन, कृषी व वनविभागातील अधिकारी, संशोधन क्षेत्रातील तज्ज्ञ आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून हा उपक्रम आकाराला आला.

कात्रीचे सरपंच संदीप वळवी यांच्या प्रयतक्तातून चारा लागवडीच्या या उपक्रमाला चालना मिळाली. पशुधनासाठी भविष्यात चाऱ्याची उपलब्धता वाढविणे, स्थानिक पातळीवर चारा उत्पादनाला प्रोत्साहन देणे आणि शेतकऱ्यांना पशुपालनासाठी अधिक सक्षम करणे, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण राबवला जात आहे.

आजची चारा लागवड म्हणजे उद्याच्या पशुधन सुरक्षेची पायाभरणी, या विचारातून ग्रामस्थांनी या उपक्रमाकडे पाहिले. सातपुड्यातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता स्थानिक पातळीवर चारा उपलब्ध झाल्यास पशुपालकांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. कात्री गावाच्या भविष्याची वाटचाल आता केवळ विकास कामांपुरती मर्यादित नसून, शेतकरीपशुपालकांच्या समृद्धीची पायाभरणी करणाऱ्या उपक्रमांकडेही वेगाने होत आहे. या उपक्रमाला तोरखापाडा ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## हिरे वैद्यकीय रुग्णालयात पी.जी. डॉक्टरांकडून अरेरावी

पूर्णतः पिजी स्टुडन्ट हाताळत असून सोनोग्राफी साठी आलेल्या रुग्णांना सायंकाळी पाच ते सहा वाजेपर्यंत वाट पाहावी लागते तरी देखील तपासणी होत नाही. २ डी इको सोनोग्राफीसाठी येणारे डॉक्टर हे सायंकाळी पाच वाजे नंतर रुग्णालयात हजर होतात त्याफुळे ग्राफीण भागातील रुग्णांना सायंकाळी पाच वाजेपासून दहा वाजेपर्यंत थांबावे लागते ती ओपीडी सकाळच्या वेळेत सुरू करण्यात यावी. महात्मा फुले योजने अंतर्गत रुग्णांना डिस्चार्ज देण्यात येताना रुग्णाच्या बेड पर्यंत कर्मचारी जात नाहीत सर्व रुग्णांना त्या कार्यालयात बोलावले जाते व तासंतास बसून ठेवले जाते त्यामुळे बरे झाल्यावर देखील रुग्णांना मानसिक त्रास सहन करावा लागतो.फिजिओथेरपी विभागासाठी अनेक साहित्याची कमतरता असून याबाबत कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही. अनेक विभागात पि.जी विद्यार्थी यांच्या अरेरावी मुळे रूग्णांना त्रास होतो त्यांना रुग्णांशी आपुलकीने वागण्याची ताकिद द्यावी. रुग्णालयाची बाह्य स्वच्छता चांगल्या प्रकारे राखण्यात प्रशासनाला यश आलेले असताना ओपीडी मधील स्वच्छतागृहात स्वच्छतेची कफतरता आढळून येत असून अनेक विभागात स्वच्छतागृहे चांगल्या प्रकारे साफ होत नसल्याने त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

समस्या आपण तातडीने सोडविण्यासाठी प्राधान्य देऊन हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या संलग्रित सर्वोपचार रुग्णालयात रुग्णांची होणारी हेळसांड थांबवावी. असे निवेदन देण्यात आले या संदर्भात अधिष्ठाता डॉ अजित पाठक यांनी अनेक उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगुन आपण दिलेल्या सूचनांचे आम्ही स्वागतच करतो.येणाऱ्या काळात या समस्या निश्चितच सुटलेल्या दिसून येतील असे आश्वासन दिले.या प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी महानगर प्रमुख धीरज पाटील, निंबा मराठे, आण्णा फुलपगारे, शेखर वाघ, शिवाजी शिरसाळे, संदीप सूर्यवंशी,मुन्ना पठाण, सुभाष मराठे, कपिल लिंगायत, निलेश कांजरेकर,सुरज भावसार, संजय पाटील,तेजस सपकाळ आदी उपस्थित होते.

## मनपातर्फे एकल महिलांच्या नोंदणीसाठी विशेष अभियान

देण्यासाठी आवश्यक माहिती संकलित करून शासनास अहवाल सादर करण्याच्या उद्देशाने ही नोंदणी करण्यात येत आहे. या नोंदणी अभियानांतर्गत कोणताही आर्थिक मोबदला देण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.एकल महिलांना नोंदणीसाठी संबंधित प्रभाग कार्यालयात तसेच धुळे महानगरपालिका मुख्यालयातील महिला व बाल कल्याण समिती कार्यालयात फॉर्म उपलब्ध करून देण्यात आले आहेत. इच्छुक महिलांनी विहित कालावधीत आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन महापौर मायादेवी परदेशी, आयुक्त नितीन कापडणीस तसेच महिला व बाल कल्याण सभापती उज्वला ठाकरे अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

नोंदणीसाठी धुळे शहरातील रहिवासी असल्याचा पुरावा, रेशनकार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, विधवा महिलांसाठी पतीचा मृत्यू दाखला, घटस्फोटित महिलांसाठी संबंधित कागदपत्रांची छायांकित प्रत, परित्यक्ता महिलांसाठी परित्यक्ता असल्याचा पुरावा अथवा स्वयंघोषणापत्र आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पात्र एकल महिलांनी या विशेष अभियानात सहभागी होऊन आपली नोंदणी करून घ्यावी आणि शासनाच्या एकल महिलांसाठीच्या धोरण निर्मितीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## एलसीबीने चौगाव येथील बनावट

यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, उपनिरीक्षक अमित माळी, हवालदार शिरीष भदाणे, संतोष हिरे, प्रशांत चौधरी, चेतन बोरसे, हेमंत बोरसे, कमलेश सुर्यवंशी, विनायक सुर्यवंशी, हर्षल चौधरी, राहुल गिरी, अमोल पाटील, हेमंत मिस्त्री यांनी कारवाई केली.

**अवैध व्यवसायाबाबत कळवावे**

मानवी जीवितास अपायकारक व घातक बनावट दारु अवैध विक्री करण्याचे उद्देशाने तयार करणे हा गंभीर अपराध आहे. यामध्ये सहभागी कोणत्याही व्यक्तीबाबत माहिती उपलब्ध असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव व संपर्क क्रमांक पुर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल. आपत्कालीन सेवा ११२, पोलीस नियंत्रण कक्ष, धुळे, किंवा आपल्या नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्नकुमार वराळेंचा

शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. वडिलांच्या बदलीनंतर त्यांना शहादा सोडावे लागले असले तरी शहाद्यातील बालपणाच्या आणि शालेय जीवनातील आठवणी आजही आपल्या मनात ताज्या असल्याची प्रतिक्रिया त्यांनी ॲड. कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांशी बोलताना व्यक्त केली.

आपल्या भावना व्यक्त करताना न्यायमूर्ती वराळे म्हणाले की, वडिलांच्या मार्गदर्शनानुसार न्यायालयीन क्षेत्रात काम करत असतानाच, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण निरंतर प्रयतक्शील आहोत.शहाद्याच्या एका प्राथमिक शाळेचा माजी विद्यार्थी आज देशाच्या सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती पदावर कार्यरत असल्याचा सार्थ अभिमान व्हॉलंटरी महिला मंडळ संस्था आणि संपूर्ण शहादा शहराने व्यक्त केला आहे. या भेटीदरम्यान संस्थेचे पदाधिकारी आणि वकील क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पान १ वरुन**

## माती आणि पाणीचे संवर्धन करा- पालकमंत्री जयकुमार रावल

आपल्याला भविष्यातील पिढीसाठी त्यांचे रक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. माती आणि पाण्याचे रक्षण करण ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे आणि त्यासाठी तरुणांना त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी ;वॉक फॉर वॉटर, हे महावॉकेथोनचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात जलसंधारणाच्या कामांना गती देण्यासाठी विविध विभागांच्या माध्यमातून एकात्मिक प्रयत्न करण्यात येत आहेत. गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजना, जलयुक्त शिवार अभियान २.० आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक ३.० या प्रमुख योजनांमधून जलसाठे निर्माण करणे, जुन्या जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे, गाळ काढणे, नाला खोलीकरण, मृदसंधारण तसेच सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन देण्याचे काम सुरू आहे.

जिल्ह्यातील जलसंधारणाची ही वाटचाल म्हणजे केवळ बंधारे, नाला खोलीकरण किंवा गाळ काढण्याची कामे नव्हेतः तर पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे योग्य नियोजन करून भविष्यातील जलसुरक्षेचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. विविध विभागांचे अभिसरण, तंत्रज्ञानाचा वापर, कामांचे जिओ-टॅगिंग, निधीचा प्रभावी वापर आणि शेतकऱ्यांच्या गरजांशी जोडलेली सिंचन व्यवस्था यामुळे जलसंधारणाला अधिक व्यापक आणि शाश्वत दिशा मिळत आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थी, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आयफोन हे कारण नाही फक्त प्रश्न जिवंत आहेत

हे प्रश्न अनुत्तरीतच आहेत. एक घर, एक कुटुंब आणि एका क्षणात सगळे संपले. ही घटना घडली आणि काही तासांत सोशल मीडियावर एक कारणही ठरले. आयफोन हवा होता म्हणून तरुणाने आत्महत्या केली. पण, एका आयफोनला या दुःखद घटनेचे कारण ठरवणे कदाचित सत्यापासून दूर जाणारे ठरू शकते. कारण पोलिसांच्या प्राथमिक तपासात आयफोन हे कारण असल्याचे दिसत नाही. तरुण तणावात होता.त्याला समजावण्याचा प्रयत्न केला जात होता. कुणीतरी आयफोन-१५ देतो असेही म्हटले होते. पण त्या एका वाक्याभोवती फिरणारी चर्चा एका कुटुंबाच्या दुःखापेक्षा मोठी ठरू लागली आहे. या घटनेनंतर एक व्हायरल व्हिडिओ समोर आला, या व्हिडिओमध्ये एक व्यक्ती तरुणाशी आयफोनबाबत बोलताना दिसते. माध्यमांच्या म्हणण्यानुसार, माजी सरपंच संजय जाधव यांच्यापर्यंत पोहोचले, त्यांनी सांगितलं की, मुलाला आयफोन हवा होता, अशी कोणतीही चर्चा झाली नव्हती. कारण, त्या मुलाकडे आधीपासूनच आयफोन होता. जाधव त्याला समजावत होते की तुझ्याकडे आयफोन आहे. आई-वडील तुझे किती लाड करतात. कदाचित त्या क्षणी कुणालाच कल्पना नव्हती की काही वेळातच हे घर कायमचे उद्धवस्त होणार आहे, असे प्रत्यक्षदर्शी संजय जाधव यांनी सांगितले.

**आत्महत्येचे खरे कारण काय?**

पोलिसांच्या प्राथमिक तपासात वडिलांसोबत झालेला वाद समोर येतोय. पण तो वाद नेमका कशावरून झाला? काय बोलले गेले? कुणाच्या मनात काय होते? या प्रश्नांची उत्तरे आता कदाचित कधीच मिळणार नाहीत. कारण त्या घराची कहाणी सांगणारे, वडील नाहीत, आई नाही आणि मुलगाही नाही. तिन्ही माणसे आणि तीन आयुष्ये आणि मागे उरलेले एक घर. शांत... सुन्न... आणि असंख्य प्रश्नांनी भरलेले आहे.

**फक्त प्रश्न जिवंत आहे.**

कधी कधी एका क्षणाचा राग आयुष्यभराची शिक्षा देऊन जातो. एका वादाने सुरुवात झाली आणि शेवट झाला तो संपूर्ण कुटुंबाच्या अंताने. आज आयफोनची चर्चा होते.पण त्या आयफोनच्या पलीकडे एक कुटुंब होते. आईची माया होती.वडिलांची स्वप्ने होती. मुलाचे एक आयुष्य होते. पण, आज नाही ते घर. नाही ते आई-वडील. नाही तो मुलगा. फक्त एक प्रश्न जिवंत आहे. नेमके त्या शेवटच्या क्षणी काय घडले होते? कदाचित या प्रश्नाचे उत्तरही त्या कुटुंबासोबतच कायमचे काळाच्या पडद्याआड गेले. कारण, आपली तपास यंत्रणा तेवढा तपास करू शकत नाही, हे वास्तव आहे.

## दारुचे भाव आता दहा पटीने वाढवा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे. सरकारने कोणताही निर्णय घेतला तरी सामान्य नागरिक त्या विरुद्ध आंदोलन करत नाहीत. कारण, त्यावर पोलीस केसेस होतात. त्यामुळे आपण जे करत आहात ते सर्वच बरोबर आहे, असे नाही, असा टोमणाही त्यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला आहे. सध्या राज्याच्या साखरेच्या दराने विक्रमी पातळी गाठली आहे. आत्तापर्यंतच्या इतिहासात प्रथमच साखरेच्या दरात वाढ होताना दिसत आहे. दरम्यान, या वाढीचा सामान्य ग्राहकांना फटका बसत आहे. मात्र, शेतकऱ्यांना या वाढत्या दराचा कुठेही फायदा होताना दिसत नाही. दरम्यान, साखरेचे दर नियंत्रीत राखण्यासाठी सरकारने प्रयत्न सुरु केले आहेत. सरकारने दहा लाख टन कच्च्या साखरेची आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळं साखरेच्या दरात झालेली वाढ कमी होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**साखरेच्या दरात वाढ का?**

दरम्यान, साखरेच्या दरात का वाढ होत आहे, याबाबतची माहिती काही अभ्यासकांनी दिली आहे. त्यांच्या मत साखरेच्या दरवाढीचे सर्वात मोठे कारण म्हणजे, कारखान्यांकडील साठ्याची कमतरता. साखर कारखान्यांकडे साखरेच्या साठ्याचे प्रमाण कमी झाले आहे. याचा परीणाम पुरवठ्यावर होत आहे. परिणामी, साखरेच्या दरात वाढ होत असल्याचे पाहायला मिळत आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये सुरू झालेल्या २०२५-२६ च्या हंगामात, देशातील साखरेचा वापर उत्पादनापेक्षा जास्त झाला. यामुळे कारखान्यांकडील उपलब्ध साठा हळूहळू कमी होऊ लागला. काही तज्ज्ञांच्या मते, सरकारने उत्पादनाच्या अंदाजानुसार १.५ ते २ दशलक्ष टन साखरेच्या निर्यातीला परवानगी दिली होती. नंतर ही मर्यादा वाढवून २ दशलक्ष टन करण्यात आली. निर्यातबंदीपूर्वी, अंदाजे ८ लाख टन साखरेची निर्यात आधीच झाली होती. दरम्यान, सरकार साखर आयात करण्याचा विचार देखील करत आहे.

## धुळ्यातील दोघांकडून एमडी पावडरसह दारूसाठा जप्त

याच्या घरासह आजूबाजूला झडती घेतली. तेथेही एमडी पावडर, देशी विदेशी दारूचा साठा असा एकूण ४५ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. संशयित कुणाल वारुडे, दीपक कापुरे यांच्याविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक हेमंत कुमार भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## नंदुरबार नगरपालिकेत नियमांची पायमल्ली करून स्थायीचे कामकाज

करण्यात आला. पत्रकारांना स्थायी समितीच्या बैठकीत प्रवेश मिळावा, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश काढलेले असतानाही मनमानी पद्धतीने निर्णय घेऊन पत्रकारांना प्रवेश नाकारण्यात आल्याचा दावा भाजप नगरसेवकांनी केला. पत्रकार हे समाजाचा आरसा असून, सभागृहात घडणाऱ्या घडामोडी जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम ते करतात. त्यामुळे नगरपालिका कामकाजात पारदर्शकता राखण्यासाठी पत्रकारांना बैठकीत प्रवेश देणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांना प्रवेश नाकारण्याच्या निर्णयाचा निषेध करत, या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. योग्य ती कार्यवाही न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा विरोधी पक्षनेता हिरालाल चौधरी यांनी दिला.यावेळी लक्ष्मण माळी, संतोष वसईकर होते.

## स्व. बाळासाहेब ठाकरे जलतरण तलावाचे दर निश्चित

राहुल वाघ यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी अधिकृत दरानुसारच शुल्क भरावे आणि अतिरिक्त शुल्काची मागणी झाल्यास ती बाब संबंधित प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मंजूर दर हे जीएसटी वगळून आहेत.

# अक्कलपाड्याचे अतिरिक्त पाणी जम्बो कॅनॉलने हरणमाळ तलाव भरा; मागणी

**धुळे, दि.२२- अक्कलपाडा प्रकल्पात सध्या मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध असून, पांझरा नदीतून अतिरिक्त पाणी वाहून जात आहे. हे पाणी वाया जाण्याऐवजी अक्कलपाडा उजवा कालवा (जम्बो कालवा) मार्गे हरणमाळ तलाव तातडीने भरावा, अशी मागणी करण्यात येत आहे.**

सुमारे दोन वर्षांपूर्वी धुळे एम.आय.डी.सी. ला भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागले होते. एम.आय.डी.सी. ला पाणीपुरवठा करणारा जलसाठा पूर्णपणे आटल्याने अनेक उद्योगांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला आणि काही उद्योगांना अनेक महिने आपले कामकाज बंद ठेवावे लागले. भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, यासाठी हरणमाळ तलावात पुरेसा पाणीसाठा करणे अत्यंत आवश्यक आहे.

यासाठी हरणमाळ तलावातून एम.आय.डी.सी. टाकीमध्ये पाणी उचलण्याची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत हरणमाळ तलावाच्या बाजूचे जॅकवेल, पंप व इतर आवश्यक कामे पूर्ण झाली आहेत. च्या बाजूला केवळ पाइपलाइनचा काही भाग पूर्ण होणे बाकी आहे. त्यामुळे ही योजना प्रत्यक्ष वापरात आणण्यासाठी हरणमाळ तलावात पाणी उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे.

सध्या हरणमाळ तलाव जवळपास रिकामा आहे. पंपिंग स्टेशनच्या कामासाठी पूर्वी तलावातील पाणी कमी करण्यात आले होते. हे काम आता पूर्ण झालेले असताना तलावात अत्यल्प प्रमाणात आणि अतिशय संथ गतीने पाणी येत आहे. त्यामुळे उपलब्ध अतिरिक्त पाणी जम्बो कालव्याद्वारे हरणमाळ तलावात वेगाने सोडून तलाव भरून घेणे गरजेचे आहे.

सध्याचा काळ यासाठी अत्यंत अनुकूल आहे. जम्बो कालव्यावरील चारही छोटे तलाव आधीच पूर्ण भरलेले आहेत. तसेच पावसाळा सुरू असल्याने पाण्याचे बाष्पीभवन, गळती किंवा पाण्याची चोरी/पिलफरेज यामुळे होणारे नुकसानही तुलनेने कमी राहील.

त्यामुळे अक्कलपाडा प्रकल्पातील अतिरिक्त पाणी वाया जाऊ न देता तातडीने जम्बो कालव्याद्वारे हरणमाळ तलावात सोडावे, अशी आग्रही मागणी आहे.

हरणमाळ तलाव आज भरला तर आगामी उन्हाळ्यात धुळे एम.आय.डी.सी. मधील उद्योगांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नाही आणि हरणमाळ पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने उपयोगात आणता येईल. यामुळे धुळे मधील उद्योगांचे सातत्याने उत्पादन सुरू राहण्यास मदत होऊन औद्योगिक विकास, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठा फायदा होणार आहे.

# महाराष्ट्र काम.कल्याण मंडळाच्या सवलतीचा लाभ कामगारांनी घ्यावा- कॉ.नाना पाटील

**दोंडाईचा, दि.२२- येथे महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्या वतीने सर्वसामान्य वीज कामगारांना तसेच राज्य सरकारी कामगारांनाविविध प्रकारच्या सवलती मिळतात त्यासर्वसामान्य कामगारांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन कॉ.नाना पाटीलयांनी कार्यक्रमा प्रसंगी केले.**

महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ कार्यालयात स्वातंत्र्यदिनानिमितकार्यक्रम आयोजित केला असता तर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रमुख पाहुणे म्हणून कॉ. नाना पाटील बोलत होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नाना किसन पाटील गुणवंत कामगार पुरस्कार यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले व शिशु मंदिर मुलांना खाऊ वाटप व गुणवंत विद्यार्थी विद्यार्थ्यांनारोख रक्कम व सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. रणजीत सिंग इंद्रसिंग गिरासे गुणवंत कामगार पुरस्कार हे उपस्थित होते व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे ठाणे विभागाचे सहाय्यक कल्याण आयुक्त नितीन विक्रम पाटील उपस्थित होते, तसेच ठाणे येथे कार्यरत असलेलेपोलीस उपनिरीक्षक सौमाया नितीन पाटील वीज मंडळवर्कर्स फेडरेशन चे पदाधिकारी कॉ. विशाल पाटील, कॉ. कैलास तिरमले, कॉ. मधुकर अहिरे, कॉ. डी.पी. ठाकूर, कॉ. गणेश मोरे, कॉ. युवराज सोनार तसेच ओंकार संगीत विद्यालयाचे संचालिका बिलवा विठ्ठल हाळवे तसेच त्यांच्या विद्यालयातील उप शिक्षिका प्रीती पाठक, नेहा कुलकर्णी, वर्षा सतीश कुलकर्णी, वंदना कुल्हेकर तसेच बांधकाम विभागातील भारती कोळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भानुदास पांडुरंग जोशी कल्याण निरीक्षक यांनी केले. या कार्यक्रमाचे नियोजन मनोज पाटील, कल्पना गिरासे, शितल पाटील व आशा पाटील यांनी केले.

**प्लॉट विकणे आहे**
चार लाखात शहाद्यात प्लॉट :-
शहादा-सावळदे शिवारात धुळे रोड पासून १०० मिटर अंतरावरील रेसीडेंशीयल ४०० रु. प्रती स्क्वे. फुटाने १०००-१२०० स्क्वे. फुटाचे प्लॉटस विकणे आहेत.
-:संपर्क :- 8055401841

**शेती विकणे आहे**
वार शिवारातील गट नं. २६८/४ टकरे तलावाला लागून ४ एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. शेतावर जाणेसाठी कायमस्वरूपी स्वतंत्र रस्ता आहे.
-:संपर्क :-
विलासराव माळी
8888101111

**कामे करुन मिळतील**
मालमत्ता (घर, दुकान, जमीन) सिटी सर्वे ऑफिस उतारे, तलाठी ऑफिस उतारे, नाव लावणेबाबत व मालमत्ता विषयक सर्व कामे करुन मिळतील!
-: संपर्क :-
8888022577

**शेती विक्री**
भाडणे शिवार, स. नं. ५४४/१, साक्री - पिंपळनेर रोड, नागाईकडे जाणारा रस्ता कॉर्नर येथील ९१ आर शेत विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क साधावा.
-: संपर्क :-
मो. 9850195001
9823189430

**पाहिजेत**
धुळे जिल्ह्यामध्ये सोलर कंपनीमध्ये काम करण्याकरीता फिल्ड ऑफिसर, ट्रेनि मॅनेजर मुला/मुलीची/स्त्री/पुरुषांची त्वरीत आवश्यकता.
वयाची व शिक्षणाची अट नाही पगार-२०,०००/- ते २५०००/-
-: संपर्क :-
7447422022
9209020526

**पाहिजेत**
होलसेल मेडिकल दुकानात कामासाठी हेल्पर- २
माल काढण्यासाठी -२
माल पोहचविण्यासाठी -३
होतकरू मुले लावणे आहेत
समक्षभेटा-
-: संपर्क :-
राजा एन्टरप्रायजेस
टॉवर बागे जवळ जे.बी.रोड, धुळे

**पाहिजेत**
हुशार व अनुभवी सेल्समन व हेल्पर पाहिजेत.
-: संपर्क :-
शाह हॅन्डलूम
गल्ली नं. २, नवग्रही पारोळा रोड, धुळे
मो. 9422792384

**विकणे आहे**
2 BHK Flat विकणे आहे.
मोहाडी रोड, पेट्रोल पम्पाजवळ, धुळे शासकीय डेअरी समोर, समता नगर, धुळे
-:Broker:-
L.G. Property
मो. 9793093955

**विकणे आहे**
वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

**प्लॉट विकणे आहे**
रामचंद्र नगर कॉंक्रीट रोडटच प्लॉट विकणे आहे. कॉटन मार्केटच्या पुढे, रामचंद्र नगरमध्ये ६० फुटी कॉंक्रीट रोडला लागून ४३०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
अग्रवाल नगरमध्ये २००० स्क्वेअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693.

**३ बीएचके बंगला भाड्याने देणे**
मालेगांव रोड लगत, महावीर सोसायटी जवळ, तीन बेडरुम, हॉल, डायनिंग, किंचन, स्टोअर रुम फर्निचरसह गार्डन कंपाऊंड पार्किंग सह बंगला भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693

**अजळकरनगर रो हाऊस विकणे**
सुरत बायपास जवळ अजळकर नगरमध्ये दोन मजली रोहाऊस घर फर्निचरसह विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693

**गाळा भाड्याने देणे**
शहरातील मध्यवर्ती भागातील साक्री रोड, नेहरू पुतळ्या समोरील १०X१५ चा गाळा भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-
7666940969
8551046952

**पाहिजेत**
लॉज कामासाठी मुलगा व मावशी लावणे आहे.
-:समक्ष भेटा :-
शांती गित लॉज
पाच कंदिल, आग्रारोड, धुळे

**भाड्याने देणे आहे**
वाडीभोकर रोडवरील स्टेडियम जवळील १५X१२चा गाळा (शॉप) भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-.
9096861610

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०